सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ०५ ऑगस्ट २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ११२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आसामच्या CRPF छावणीत एएसआयने सहकाऱ्यांवर झाडल्या गोळ्या, 3 जवानांचा मृत्यू, एक गंभीर

**गुवाहाटी :** आसाममधील नागाव जिल्ह्यातील कटीमारी येथील केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (CRPF) छावणीत सोमवारी घडलेल्या गोळीबाराच्या घटनेने संपूर्ण सुरक्षा यंत्रणेला हादरा बसला आहे. एका सहायक उपनिरीक्षकाने (ASI) आपल्या सहकारी जवानांवर अचानक गोळीबार केल्याने तीन जणांचा मृत्यू झाला, तर एक जवान गंभीर जखमी झाला आहे. या घटनेनंतर संपूर्ण छावणीत खळबळ उडाली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कटीमारी येथील सीआरपीएफ छावणीत तैनात असलेले एएसआय बलानी प्रेमब्रह्म यांनी अचानक त्यांच्या सर्व्हिस रिव्हॉल्व्हरमधून सहकाऱ्यांवर गोळीबार सुरू केला. या हल्ल्यात रामनवल सिंग यादव आणि विष्णू प्रसाद बघेल यांना गंभीर गोळ्या लागल्या. त्यांना तातडीने मदत करण्याचा प्रयत्न झाला, मात्र त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

**सहकाऱ्यांवर गोळीबार केल्यानंतर स्वतःवरही झाडली गोळी :** गोळीबारानंतर छावणीत एकच गोंधळ उडाला. प्राथमिक माहितीनुसार, सहकाऱ्यांवर गोळीबार केल्यानंतर एएसआय बलानी प्रेमब्रह्म यांनी स्वतःवरही गोळी झाडली. गंभीर जखमी झाल्याने त्यांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला. त्यामुळे या घटनेत एकूण तीन जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेत गोविंद श्रीपुल नावाचा आणखी एक जवान गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने नागाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्याच्यावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

**घटनास्थळी वरिष्ठ अधिकारी दाखल, तपास सुरू :** घटनेची माहिती मिळताच सीआरपीएफचे वरिष्ठ अधिकारी, स्थानिक पोलीस आणि इतर सुरक्षा यंत्रणांचे पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. संपूर्ण छावणीचा परिसर ताब्यात घेऊन घटनास्थळाची पाहणी करण्यात आली. फॉरेन्सिक पथकाने पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली असून, मृत जवानांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.

**गोळीबारामागचे कारण अद्याप अस्पष्ट :** एएसआयने सहकाऱ्यांवर गोळीबार करण्यामागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तपास यंत्रणा वैयक्तिक वाद, मानसिक तणाव, ड्युटीशी संबंधित मतभेद किंवा इतर कोणतेही कारण या सर्व शक्यतांचा तपास करत आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की, चौकशी पूर्ण झाल्यानंतरच या घटनेमागील सत्य समोर येईल. या धक्कादायक घटनेमुळे सीआरपीएफसह देशातील सुरक्षा दलांमध्ये चिंता व्यक्त केली जात असून, जवानांच्या मानसिक आरोग्य, तणाव व्यवस्थापन आणि समुपदेशनाच्या गरजेवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

## अभिजीत दिपके यांच्याविरोधात फैजान अंसारी यांची पोलिसांत तक्रार

**नवी दिल्ली, 04 ऑगस्ट :** सोशल मीडिया इन्फ्लुएंसर फैजान अंसारी यांनी सीजेपी (सीजेपी) पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्याविरोधात दिल्ली पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. दिपके यांच्याशी संबंधित लोकांनी आपल्यावर हल्ला केल्याचा आरोप अंसारी यांनी केला आहे.

फैजान अंसारी यांनी सांगितले की, त्यांनी दिल्लीतील डीसीपी कार्यालयात अभिजीत दिपके यांच्याविरोधात लेखी तक्रार दाखल केली आहे. कथित हल्ल्याशी संबंधित पुरावे आपल्याकडे असल्याचा दावा त्यांनी केला आहे. अंसारी यांच्या म्हणण्यानुसार, पुणे आणि औरंगाबाद येथे त्यांच्यावर हल्ल्याच्या घटना घडल्या असून, या प्रकरणांबाबत यापूर्वीच दोन गुन्हे दाखल आहेत.अंसारी यांनी दिल्ली पोलिसांकडे या प्रकरणात तातडीने कारवाई करून अभिजीत दिपके यांना अटक करण्याची मागणी केली आहे.

यावेळी त्यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि दिल्ली पोलिसांचे कौतुक केले. सोनम वांगचुक यांना योग्य वेळी ताब्यात घेतल्यामुळे दिल्लीतील परिस्थिती बिघडण्यापासून रोखता आल्याचे अंसारी यांनी म्हटले आहे.अंसारी यांनी असा आरोपही केला की, अभिजीत दिपके हे आपल्या वैयक्तिक हितासाठी या सर्व गोष्टी करत आहेत. ही तक्रार दिल्लीमध्ये दाखल करण्यात आली असून, पुढील कारवाई दिल्ली पोलिसांकडून केली जाणार आहे.

## केज येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापनेला मंत्रिमंडळाची मंजुरी

**बीड, ४ ऑगस्ट :** केज येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन करण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयासोबतच न्यायालयासाठी आवश्यक न्यायिक अधिकारी व कर्मचारी पदे तसेच त्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या तरतुदीलाही मान्यता देण्यात आली आहे. केज परिसरातील नागरिक आणि वकिलांची अनेक वर्षांपासूनची प्रलंबित मागणी पूर्ण करण्यासाठी आमदार नमिता मुंदडा यांनी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून, केज येथे स्वतंत्र वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रबंधकांनी यापूर्वी केज येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्याबाबत विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिवांकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेण्यासाठी आमदार नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन ९ मार्च २०२६ रोजी लेखी निवेदन सादर केले होते. त्यामध्ये न्यायालय स्थापनेला लवकर मंजुरी देण्याची मागणी करण्यात आली होती. या पाठपुराव्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने प्रस्तावित न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रलंबित प्रकरणे, न्यायालयाचे अंतर आणि इतर तांत्रिक बाबींची माहिती घेऊन प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण केली. दरम्यान, जिल्हा व सत्र न्यायालयाकडूनही न्यायालय निर्मितीच्या प्रस्तावाबाबत केज वकील संघाला अधिकृत माहिती देण्यात आली होती. सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अखेर राज्य मंत्रिमंडळाने या प्रस्तावाला मंजुरी दिली. या निर्णयामुळे केज आणि परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, न्यायदानाची प्रक्रिया अधिक गतिमान होण्यास मदत होईल. तसेच प्रलंबित खटल्यांचा निपटारा स्थानिक पातळीवर जलदगतीने होण्याची शक्यता आहे. या मंजुरीबद्दल आमदार नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री पंकजाताई मुंडे आणि विधी व न्याय राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांचे आभार मानले.

## उल्हासनगरमध्ये इमारतीला भीषण आग, 10 हून अधिक वाहने भस्मसात

**उल्हासनगर :** उल्हासनगरमधील गजबजलेल्या वीनस चौक परिसरात असलेल्या 'आशालोक' इमारतीत मंगळवारी अचानक झालेल्या भीषण अग्निकांडाने एकच खळबळ उडवून दिली. इमारतीच्या ग्राउंड फ्लोअरवरील मीटर बॉक्समध्ये अचानक झालेल्या शॉर्टसर्किटमुळे ही आग भडकली. काही क्षणांतच या आगीने अत्यंत रौद्ररूप धारण केले आणि ज्वाला दुसऱ्या तसेच तिसऱ्या मजल्यापर्यंत पसरल्या. या दुर्घटनेत इमारतीच्या आवारात उभी असलेली १० हून अधिक वाहने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली असून ती जळून खाक झाली आहेत.

मीटर बॉक्समधील आगीमुळे निर्माण झालेल्या प्रचंड आणि दाट धुराचे लोट वेगाने वरच्या मजल्यांच्या दिशेने पसरले. अवघ्या काही मिनिटांतच संपूर्ण इमारतीचे जिने आणि कॉरिडॉर धुराने वेढले गेल्यामुळे रहिवाशांना बाहेर पडण्याचा मार्ग उरला नाही. धुरामुळे श्वास गुदमरण्याची वेळ आल्याने अनेक नागरिक आपल्या फ्लॅटमध्येच तुंबून राहिले. इमारतीतून बचाव पथकासाठी आणि मदतीसाठी होणारा आक्रोश पाहून परिसरात प्रचंड घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते.

## आसारामच्या वैद्यकीय जामिनावर सर्वोच्च न्यायालयात ६ ऑगस्ट रोजी सुनावणी



**नवी दिल्ली, 04 ऑगस्ट :** जोधपूरमधील अल्पवयीन विद्यार्थिनीवरील बलात्कार प्रकरणात दोषी ठरलेल्या आसाराम बापूंच्या अंतरिम वैद्यकीय जामिनाच्या अर्जावर सर्वोच्च न्यायालय ६ ऑगस्ट रोजी सुनावणी घेणार आहे. दरम्यान, एम्सनेआपला वैद्यकीय अहवाल न्यायालयाला सादर केला आहे. या अहवालानुसार, आसाराम बापूंना सध्या रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता नाही, पण त्यांच्यावर २४ तास वैद्यकीय देखरेख ठेवणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने अहवालाचे पुनरावलोकन करताना त्यातील काही मुद्द्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सुनावणीदरम्यान त्यांचे आरोग्य, वैद्यकीय अहवाल आणि जामिनाचा अर्ज हे महत्त्वाचे मुद्दे असतील.

मागील सुनावणीदरम्यान, राजस्थान सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले की, आसाराम बापू पूर्णपणे निरोगी असून त्यांनी तीन महिन्यांपूर्वी अयोध्या आणि काशी विश्वनाथला भेट दिली होती. मेहता यांनी सांगितले की, ते सर्वत्र चालत आणि प्रवास करत होते. ३० जून रोजी आसारामच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना न्यायालयाने राजस्थान सरकारला नोटीस बजावली होती.सर्वोच्च न्यायालयाने आसाराम बापू यांना दिलेली शिक्षा स्थगित करण्यास नकार दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने आसाराम बापू यांना तुरुंगात पुरवण्यात येत असलेल्या वैद्यकीय सुविधा सुरू ठेवण्याचे आदेश दिले होते. त्यांच्या आरोग्याला गंभीर धोका असेल तरच जामीन मंजूर करण्याचा विचार केला जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते.

आसाराम राजस्थानच्या जोधपूर तुरुंगात असून, त्यांचा जामीन अर्ज डझनहून अधिक वेळा फेटाळण्यात आला आहे. लैंगिक अत्याचाराच्या आरोपाखाली २०१३ मध्ये आसाराम यांना अटक करण्यात आली होती. २० ऑगस्ट २०१३ रोजी जोधपूर आश्रमात त्यांच्याविरुद्ध लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## सीबीएसईच्या तीन-भाषा धोरणाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान; तातडीच्या सुनावणीची मागणी

**नवी दिल्ली, 04 ऑगस्ट :** सीबीएसईच्या नववीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू करण्यात आलेल्या तीन-भाषा धोरणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली आहे.



याचिकाकर्त्यांच्या वतीने मंगळवारी ज्येष्ठ अधिवक्ता गोपाल शंकरनारायणन यांनी सरन्यायमूर्ती सूर्यकांत, न्या. जॉयमाल्य बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर युक्तिवाद करताना सांगितले की, शैक्षणिक सत्र सुरू झाले असल्याने या प्रकरणावर बुधवार किंवा गुरुवारी सुनावणी घेण्यात यावी. सीबीएसईच्या नव्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी पुरेसे शिक्षक आणि आवश्यक पाठ्यपुस्तके उपलब्ध नसल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. यावर सरन्यायमूर्तींनी "आम्ही पाहू" असे सांगितले.

यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने या धोरणाला आव्हान देणाऱ्या दोन नवीन याचिकांवर केंद्र सरकार, एनसीईआरटी आणि सीबीएसई यांच्याकडून उत्तर मागितले होते. या याचिकांची सुनावणी 29 जुलै रोजी निश्चित करण्यात आली होती. केंद्र सरकार, सीबीएसई आणि एनसीईआरटी यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) 2020 अंतर्गत तीन-भाषा धोरणाचे समर्थन केले आहे. हे धोरण "बहुभाषिकता आणि राष्ट्रीय एकतेला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक" असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच धोरणाविरोधातील याचिका फेटाळण्याची मागणी केली आहे.

यापूर्वीच्या सुनावणीदरम्यान एका ज्येष्ठ वकिलांनी आरोप केला होता की, सीबीएसई शिक्षणाचा अधिकार कायद्याच्या विरोधात जाणारे परिपत्रक लागू करत आहे. विद्यार्थ्यांवर कोणताही पर्याय न देता भाषा लादली जात असल्याचा दावा त्यांनी केला.सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांना या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सीबीएसईच्या लॉजिस्टिक तयारीबाबत अहवाल सादर करण्यास सांगितले होते.

याचिकाकर्त्या यशिका भंडारी जैन आणि इतरांच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी सांगितले की, सीबीएसईने देशभरातील शाळांसाठी परिपत्रक जारी केले असून त्यानुसार पुढील शैक्षणिक सत्रापासून नववीच्या विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकणे बंधनकारक करण्यात आले आहे. सीबीएसईच्या 15 मे रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, 1 जुलै 2026 पासून इयत्ता नववीसाठी तीन भाषा (आर-1, आर-2, आर-3) शिकणे अनिवार्य असेल. यापैकी किमान 2 भाषा भारतीय असणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांना परदेशी भाषा निवडायची असल्यास, त्यांनी आधी दोन भारतीय भाषा शिकणे आवश्यक असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## सातारा-देवळाई पाणीपुरवठा योजनेला वेग; किशोर शितोळे यांच्या पाठपुराव्यानंतर मुख्य जलवाहिनी जोडण्याचे आश्वासन

### नागरिकांच्या उपस्थितीत पाहणी; तीन पाण्याच्या टाक्यांची कामे अंतिम टप्प्यात

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** सातारा-देवळाई परिसरातील रखडलेल्या पाणीपुरवठा योजनेला गती मिळावी, यासाठी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी मंगळवारी संबंधित अधिकारी, कंत्राटदार आणि नागरिकांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा आढावा घेतला. यावेळी प्रभाग समितीच्या सभापती तथा नगरसेविका सविताताई कुलकर्णी, नगरसेवक पदमसिंग राजपूत, ज्ञानेश्वर बोरसे, सेलूकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे, संबंधित



अधिकारी, कंत्राटदार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाहणीदरम्यान नागरिकांनी पाणीपुरवठा योजनेतील दिरंगाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यानंतर किशोर शितोळे यांनी सातारा पोलीस ठाण्यामागील टाकीच्या मुख्य जलवाहिनीचे कनेक्शन तातडीने पूर्ण करण्याची भूमिका घेत संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांना धारेवर धरले. यावेळी कंत्राटदाराने आजच रात्री मुख्य पाइपलाइन जोडण्याचे तसेच बीड बायपास क्रॉसिंगचे काम आज-उद्यापर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

> "सातारा-देवळाई परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागू नये, हीच आमची भूमिका आहे. रखडलेली कामे तातडीने पूर्ण करून नियमित पाणीपुरवठा सुरू व्हावा, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत राहू. नागरिकांच्या पाण्याच्या प्रश्नावर कोणतीही तडजोड होऊ देणार नाही."
>
> - किशोर शितोळे भाजप शहर जिल्हाध्यक्ष

यानंतर अमीरनगर, एजीपी शाळेजवळील, म्हाडा परिसरातील तसेच आलोकनगर येथील पाण्याच्या टाक्यांची पाहणी करण्यात आली. या टाक्यांची कामे अंतिम टप्प्यात असून केवळ किरकोळ कामे शिल्लक असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मुख्य जलवाहिनीवरून टाक्यांना जोडणी करण्यासाठी शटडाऊन आवश्यक असल्याने काही दिवसांचा कालावधी लागणार असला, तरी सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुढील १५ ते २० दिवसांत या भागातील नियमित पाणीपुरवठा सुरू होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. यावेळी किशोर शितोळे यांनी नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेपर्यंत सातत्याने पाठपुरावा सुरू राहील, अशी ग्वाही दिली.

## उदयनिधी स्टालिन यांना न्यायालयाकडून दिलासा; चौकशीनंतर जामिनावर सुटका



**चेन्नई , 04 ऑगस्ट :** अभिनेत्री तृषाविरोधात कथित टिप्पणी केल्याप्रकरणी तमिळनाडूचे माजी उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टालिन यांना पोलिसांनी अटक केली होती. मात्र, मद्रास उच्च न्यायालयाकडून त्यांना दिलासा मिळाला आहे. वृत्तानुसार, मद्रास उच्च न्यायालयात तमिळनाडू सरकारने सांगितले की, चौकशीनंतर उदयनिधी स्टालिन यांची आजच पोलीस ठाण्यातून जामिनावर सुटका करण्यात येईल. तसेच, त्यांना कोठडीची मागणी करण्याचा सरकारचा कोणताही हेतू नसल्याचेही न्यायालयाला सांगण्यात आले. चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यांची मुक्तता करण्यात येणार आहे. अभिनेत्री तृषा यांच्याविरोधात कथित टिप्पणी केल्याप्रकरणी उदयनिधी स्टालिन यांच्यावर भारतीय न्याय संहिता (बीएनएस), माहिती तंत्रज्ञान कायदा तसेच तमिळनाडू महिला छळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाच्या महिला आघाडीने तंजावूर पूर्व पोलीस ठाण्यात उदयनिधी स्टालिन यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी आज चेन्नईतील त्यांच्या निवासस्थानातून त्यांना ताब्यात घेतले.

## पंजाबमध्ये आयएसआय-समर्थित दोन दहशतवादी गटांचा भंडाफोड

**चंदीगड, ४ ऑगस्ट :** पंजाबमधील अमृतसर पोलिसांनी पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या पाठिंब्याने कार्यरत असलेल्या दोन दहशतवादी गटांचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत 4 अल्पवयीन मुलांसह एकूण 9आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून तीन बेकायदेशीर पिस्तूल, 9 जिवंत काडतुसे आणि पेट्रोलच्या चार बाटल्या जप्त करण्यात आल्या.

पंजाब पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी सांगितले की, अटक केलेले आरोपी परदेशातील आयएसआयच्या सूत्रधारांच्या संपर्कात होते आणि त्यांच्या सूचनेनुसार काम करत होते. या तरुणांना दहशतवादी कारवायांसाठी तयार केले जात होते. त्यांना सुरक्षा यंत्रणांची टेहळणी करणे, बेकायदेशीर शस्त्रे मिळवणे आणि पंजाबमधील शांतता व कायदा-सुव्यवस्था बिघडवणे यांसारखी कामे सोपवण्यात आली होती. पोलिसांनी केलेल्या तपासणीत असे आढळून आले की, आरोपींनी रेल्वे रुळांजवळ पाळत ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले होते. या कॅमेऱ्यांमधून रेकॉर्ड केलेले फुटेज संवेदनशील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी परदेशी आयएसआयच्या सूत्रधारांना पाठवले जात असल्याचा आरोप आहे. सुमारे महिनाभरापूर्वी, अमृतसर-दिल्ली रेल्वे मार्गावरील एका ओव्हरहेड विद्युत खांबावर एक सीसीटीव्ही कॅमेरा आढळून आला होता.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण; पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन

**मुंबई दि.4 :** आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतःच्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले.

प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता.

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचा उपचार पैशांअभावी थांबू नये, या उद्देशाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. त्याच भावनेतून प्रशांत इंगळे यांना वेळेत आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून देता आली, याचा आम्हाला आनंद आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी नागरिकांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.
>
> -रामेश्वर नाईक
> कक्ष प्रमुख
> मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष

अशा कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला.

या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून २०२६ रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै २०२६ रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत.

वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे आपल्याला नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त करत इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच टाटा ट्रस्ट यांचे मनःपूर्वक आभार मानले.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आळणी पाटीजवळ गोवंशाची अमानुष वाहतूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

आळणी पाटी परिसरात गोवंशीय जनावरांची अमानुष पद्धतीने वाहतूक करणाऱ्या वाहनावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत चार गोवंशीय जनावरे जप्त केली असून चालकाविरुद्ध धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, अशोक चंद्रकांत भराते (वय ४२, रा. मेन रोड, भूम, ता. भूम, जि. धाराशिव) हा ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता एमएच-२५-एजे-२७८८ क्रमांकाच्या छोटा हत्ती वाहनातून चार गोवंशीय जनावरांची वाहतूक करत होता. या जनावरांची एकूण किंमत सुमारे २ लाख २० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

आळणी पाटी येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वाहनाची तपासणी केली असता जनावरे कोणतीही चारापाण्याची व्यवस्था न करता दाटीवाटीने भरून वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर वाहनासह जनावरे ताब्यात घेऊन कारवाई करण्यात आली.



## संक्षिप्त वृत्त...



### जिल्हा सहकारी बोर्डावरील निवडीबद्दल गाढवे यांचा सत्कार

**परंडा, दि.४ ऑगस्ट -**

जिल्हा सहकारी बोर्डावर निवड झाल्याबद्दल शिवसेनेच्या वतीने नितीन गाढवे यांचा परंडा पंचायत समिती येथे सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख दत्ता साळुंके, पै. नवनाथ जगताप, सभापती प्रतिनिधी अण्णासाहेब जाधव, सचिन सोनारीकर, कल्याण शिंदे, संतोष जहागीरदार, औदुंबर गाडे, शहाजी ढोरे, धर्मा गटकूळ यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी गाढवे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



### ढोकी येथे १०० केव्हीएचा नवीन डीपी सुरू करण्याची मागणी

**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

तालुक्यातील ढोकी येथे मंजूर असलेला १०० केव्हीए क्षमतेचा नवीन वीज वितरण (डीपी) तातडीने सुरू करण्यात यावा, अशी मागणी शिवसेना राज्य आंदोलन समन्वयक तथा शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. तुकाराम शिंदे यांनी पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. मुंबई येथे झालेल्या भेटीत ॲड. शिंदे यांनी ढोकी येथील नागरिकांना पावसाळ्यात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद केले. मंजूर असलेल्या १०० केव्हीए डीपीचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी त्यांनी केली. यावर पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरच आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही दिल्याचे ॲड. शिंदे यांनी सांगितले.

### अपघातप्रकरणी पिकअप चालकावर गुन्हा; मृत्यूनंतर कारवाई

**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

तेर-धाराशिव मार्गावरील हिंगळजवाडीजवळ झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याप्रकरणी पिकअप चालकाविरुद्ध ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, सचिन राजेंद्र पिसे (वय ४२, रा. धाराशिव) हे दि. २७ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.५० वाजता एमएच-२५-झेड-६४५२ क्रमांकाच्या दुचाकीवरून धाराशिव-तेर मार्गाने जात होते. हिंगळजवाडी गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर दत्तात्रय कानाडे यांच्या शेताजवळ समोरून येणाऱ्या एमएच-२५-एजे-५४५६ क्रमांकाच्या पिकअपने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.फिर्यादीनुसार, पिकअप चालक धनाजी निवृत्ती करपुरे (रा. तेर, ता. जि. धाराशिव) याने वाहन भरधाव, हयगईने व निष्काळजीपणे चालविल्यामुळे हा अपघात झाला. या धडकेत सचिन पिसे गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला होता.

## धाराशिव पोलिसांचा एमडी ड्रग्स रॅकेटला मोठा दणका...

# ११.२१ ग्रॅम मेफेड्रोनसह दोघांना अटक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

धाराशिव जिल्ह्यात तरुण पिढीला नशेच्या गर्तेत लोटणाऱ्या एमडी (मेफेड्रोन) या अमली पदार्थाच्या विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत ११.२१ ग्रॅम एमडी ड्रग्स जप्त केले असून दोन संशयितांना अटक केली आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या अवैध व्यवहाराला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

मागील काही दिवसांपासून धाराशिव जिल्ह्यात एमडी या अमली पदार्थाची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त होत होती. या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला



गोपनीय माहिती संकलित करून कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार ३ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार हे पथकासह कळंब पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना गोपनीय माहितीदाराकडून निखिल जाधव व अरविंद कांबळे हे कळंब-येरमाळा रोडवरील पाझर तलावाजवळ एमडी ड्रग्स घेऊन येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

माहितीची शहानिशा करून एनडीपीएस कायद्यातील सर्व तरतुदींचे पालन करत पंच, फॉरेन्सिक व्हॅन व पोलीस पथकासह सापळा रचण्यात आला.

संशयित दोघे दुचाकीसह रस्त्याच्या कडेला उभे असताना त्यांना ताब्यात घेऊन पंचांसमक्ष अंगझडती घेण्यात आली. त्यावेळी त्यांच्या ताब्यातील २९ पारदर्शक प्लास्टिकच्या पुड्यांमध्ये ठेवलेले एकूण ११.२१ ग्रॅम पांढऱ्या स्फटिक स्वरूपातील एमडी (मेफेड्रोन) जप्त करण्यात आले.


या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३२६/२०२६ दाखल करण्यात आला असून आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम ८ (क) व २२ (ब) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि खटके, सपोनि मगर तसेच स्थानिक गुन्हे शाखा व कळंब पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ही यशस्वी कारवाई पार पाडली.

## डायल ११२ वर बॉम्बस्फोटाची खोटी माहिती; मद्यधुंद व्यक्तीवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर डायल ११२ वर बॉम्बस्फोटाबाबत खोटी माहिती देणाऱ्या मद्यधुंद व्यक्तीविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ७.२४ वाजता शितल रघुनाथ कांबळे (वय ४५, रा. काकडे प्लॉट, शाहूनगर, धाराशिव) यांनी डायल ११२ वर फोन करून, १५ ऑगस्टला प्रियांका कांबळे नामक व्यक्ती बॉम्बस्फोट करणार आहे, अशी माहिती दिली.

या माहितीची गांभीर्याने दखल घेत धाराशिव शहर पोलीस तातडीने डायल ११२ पथकासह संबंधित ठिकाणी पोहोचले. मात्र, घटनास्थळी चौकशी केली असता कोणतीही संशयास्पद घटना घडलेली नसल्याचे निष्पन्न झाले. चौकशीदरम्यान संबंधित व्यक्ती मद्याच्या नशेत असल्याचे आढळून आले. त्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

पोलीस यंत्रणेला खोटी माहिती देऊन दिशाभूल केल्याप्रकरणी शितल रघुनाथ कांबळे याच्याविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## विधान परिषद आ. बसवराज पाटील यांचा सत्कार...

### उमरग्यात महात्मा बसवेश्वरांचा अश्वारुढ पुतळा उभारण्याची मागणी; आ. पाटील यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ ऑगस्ट -**

बसवरत्न पुरस्कार नियोजन समिती, धाराशिव जिल्हाच्या वतीने विधान परिषदेवर निवडून आलेले आमदार बसवराज पाटील यांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उमरगा शहरात १२व्या शतकातील समाजसुधारक, सर्वधर्मसमभावाचे पुरस्कर्ते आणि जातिभेद निर्मूलनासाठी कार्य करणारे महात्मा बसवेश्वर महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा व स्मारक उभारण्याची मागणी करणारे निवेदन त्यांना देण्यात आले.

निवेदनात महात्मा बसवेश्वर यांच्या समता, बंधुता आणि मानवतेच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचावा, समाजात सामाजिक सलोखा अधिक दृढ व्हावा तसेच उमरगा शहराच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वैभवात भर पडावी, या उद्देशाने भव्य अश्वारूढ स्मारक उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. यावर आमदार बसवराज पाटील यांनी समितीच्या मागणीची सकारात्मक दखल घेत आवश्यक स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, बळीराजा पानंद रस्ते योजनेचे सहअध्यक्ष शरण पाटील, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मिलिंद लातूरे, भाजप तालुकाध्यक्ष प्रल्हाद काळे, डॉ. सचिन विश्वेकर, माजी नगरसेवक एम. ओ. पाटील, डॉ. मल्लिकार्जुन खिचडे, माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप भालेराव, डॉ. दत्तात्रय खलंगारे, नगरसेवक राजेंद्र पतगे, मल्लिनाथ दंडगे आदी उपस्थित होते.

तसेच बसवरत्न पुरस्कार नियोजन समितीचे अध्यक्ष सन्नी पाटील, सचिव शिवकांत पतगे, बालाजी कुडुंबले, करण पाटील, संजय म्हेत्रे, बालाजी पतगे, संदीप लिंबाळे यांच्यासह समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोखंडी सळईने भरलेला ट्रक कारवर कोसळला; सुदैवाने जीवितहानी टळली

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ ऑगस्ट -**

सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील खड्ड्यांमुळे आणखी एक भीषण अपघात घडला असून अणदूरजवळ लोखंडी सळईने भरलेला ट्रक रस्त्यालगत उभ्या असलेल्या इर्टिगा कारवर उलटल्याची घटना घडली. सुदैवाने कारमधील प्रवासी औषध घेण्यासाठी मेडिकल दुकानात गेल्याने मोठी जीवितहानी टळली.



मिळालेल्या माहितीनुसार, दि. ३ ऑगस्ट रोजी रात्री केए-५६-८४८४ क्रमांकाचा लोखंडी सळईने भरलेला ट्रक सोलापूरहून हैदराबादकडे जात होता. अणदूरजवळ महामार्गावरील मोठ्या खड्ड्यात ट्रकचे चाक गेल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि ट्रक रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एमएच-१३-ईके-५१५६ क्रमांकाच्या इर्टिगा कारवर जाऊन कोसळला.

**अणदूरजवळील घटना; महामार्गावरील खड्डा ठरला अपघाताचे कारण**

अपघाताच्या वेळी कारमधील प्रवासी जवळील मेडिकलमध्ये औषधे घेण्यासाठी गेले असल्याने कार रिकामी होती. त्यामुळे संभाव्य मोठी जीवितहानी टळली. मात्र, कारचे मोठे नुकसान झाले. सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील अणदूर ते नळदुर्ग बायपासमार्गे मुर्टा पाटीपर्यंतच्या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून काही ठिकाणी बाजूच्या नाल्यांची कामेही अपूर्ण आहेत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. स्थानिक वाहनचालकांच्या म्हणण्यानुसार, फुलवाडी येथील टोलनाक्यावर नियमित टोलवसुली सुरू असली तरी महामार्गाच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत आहे.

अपघातग्रस्त वाहने हटविण्यासाठी उपलब्ध क्रेनही अपुरी आणि वारंवार बिघाडग्रस्त असल्याने बचावकार्यात विलंब होत असल्याची तक्रारही वाहनचालकांनी केली आहे. महामार्गावरील खड्डे तातडीने बुजवून रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा भविष्यात आणखी गंभीर अपघात होऊन मोठी जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वाहनचालक व प्रवाशांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तात्काळ या प्रश्नाकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे.

## पाटील तांड्यावर पोलिसांचा छापा; ५.०७ लाखांचा हातभट्टी दारूचा मुद्देमाल जप्त, १४ जणांवर गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ ऑगस्ट -**

हातभट्टी दारू गाळपासाठी प्रसिद्ध असलेल्या पाटील तांड्यावर मंगळवारी (दि. ४ ऑगस्ट) सकाळी नळदुर्ग पोलिस आणि उत्पादन शुल्क विभागाने संयुक्तपणे धडक कारवाई करत तब्बल ५ लाख ७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी १४ जणांविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांची चाहूल लागताच सर्व आरोपी घटनास्थळावरून फरार झाले.

उपविभागीय पोलीस अधिकारी मनोहर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी सुमारे ७ वाजता ही कारवाई करण्यात आली. हातभट्टी दारूच्या अड्ड्यांवर मोठ्या फौजफाट्यासह टाकलेल्या या छाप्यात १२ हजार ५०० लिटर गुळमिश्रित रसायन (किंमत ४ लाख ३७ हजार ५०० रुपये) तसेच ७०० लिटर हातभट्टी दारू (किंमत ७० हजार रुपये) असा एकूण ५ लाख ७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईत उपविभागीय पोलीस अधिकारी मनोहर पाटील यांच्यासह नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके, आनंद कांगुने, पोलीस उपनिरीक्षक अख्तर सय्यद, ईश्वर नांगरे, भुतेकर, श्रीकांत हजारे, सखाराम मिटके, दिलीप राठोड, बालाजी शिंदे तसेच तुळजापूर व तामलवाडी पोलीस ठाण्यातील ३२ पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

**१२,५०० लिटर गुळमिश्रित रसायन आणि ७०० लिटर हातभट्टी दारू नष्ट**

उत्पादन शुल्क विभागाचे ८ अधिकारी आणि ३२ कर्मचाऱ्यांनीही या मोहिमेत सहभाग घेतला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी विमल चव्हाण, सुरेश पवार, हरीश जाधव, विकास राठोड यांच्यासह एकूण १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र, पोलिसांची कारवाई सुरू होण्यापूर्वीच आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. विशेष म्हणजे, कारवाईपूर्वी मोठा पोलीस बंदोबस्त नळदुर्ग बसस्थानकाजवळील अक्कलकोट रस्त्यावर एकत्र जमल्याने परिसरातील अवैध धंदे चालकांमध्ये एकच खळबळ उडाली होती. या धाडीत महिला पोलीस कर्मचाऱ्यांचाही सहभाग होता.

अलीकडच्या काळात पाटील तांड्यावर झालेल्या सर्वात मोठ्या कारवाईंपैकी ही एक मानली जात असून, हातभट्टी दारूच्या अवैध व्यवसायाविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

## चांदणी प्रकल्प कोरडा | उजनीतून पाणी सोडण्याची सुजितसिंह ठाकूर यांची जलसंपदामंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ ऑगस्ट -**

धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यात यंदा अत्यल्प पाऊस झाल्याने चांदणी मध्यम प्रकल्प पूर्णपणे कोरडा पडला असून प्रकल्पातील पाणीसाठा शून्य टक्क्यांवर आला आहे. या पार्श्वभूमीवर उजनी धरणातून बार्शी उपसा सिंचन योजनेद्वारे चांदणी प्रकल्पात तसेच शिराळा उपसा सिंचन योजनेतून परिसरातील पाझर तलावांमध्ये पाणी सोडण्याची मागणी भाजप नेते तथा माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पत्रात नमूद केल्याप्रमाणे, परंडा तालुका हा सातत्याने अवर्षणग्रस्त आणि दुष्काळी म्हणून ओळखला जातो. यंदाही तालुक्यात अत्यल्प पाऊस झाल्याने चांदणी मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात पुरेसा पाऊस पडलेला नाही. परिणामी प्रकल्पात पाण्याची आवकच झाली नसून सध्या पाणीसाठा शून्य टक्के आहे. त्यामुळे तालुक्यातील गावांसह शेतकऱ्यांसमोर दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून भविष्यात तीव्र पाणीटंचाईचा धोका वाढला आहे.



चांदणी मध्यम प्रकल्पातून सोलापूर जिल्ह्यातील बार्शी शहराला पाणीपुरवठा केला जातो. मात्र प्रकल्प कोरडा पडल्याने बार्शी शहरालाही पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने धरण पूर्ण क्षमतेने भरले असून तेथून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे याच काळात बार्शी उपसा सिंचन योजनेद्वारे चांदणी मध्यम प्रकल्पात पाणी सोडावे. तसेच शिराळा उपसा सिंचन योजनेतून परिसरातील पाझर तलाव भरून घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आदेश द्यावेत, अशी मागणी सुजितसिंह ठाकूर यांनी जलसंपदामंत्र्यांकडे केली आहे.

या मागणीमुळे परंडा तालुक्यातील नागरिक, शेतकरी आणि बार्शी शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## उघड्या खड्ड्यात पडून चिमुकलीचा मृत्यू; पाच जणांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील ढोकरी येथे शेतातील उघड्या खड्ड्यात पडून दोन वर्षांच्या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिव्या अजय पवार (वय २०, रा. ढोकरी, ता. तुळजापूर) यांची दोन वर्षांची मुलगी आरुषी अजय पवार ही ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते १०.१५ वाजण्याच्या सुमारास घराशेजारी खेळत होती. त्यावेळी घरालगतच्या शेतामध्ये खोदलेला खड्डा कोणतेही संरक्षण, कंपाउंड वॉल किंवा सुरक्षितता कट्टा न उभारता उघडाच ठेवण्यात आला होता. या खड्ड्यात पडल्याने आरुषीचा मृत्यू झाला.

फिर्यादीनुसार, भाऊ उर्फ भाऊसाहेब मनोहर लाटे (पाटील), लखन भाऊ लाटे (पाटील), तेजस चांगदेव माने (सरपंच), गुणवंत बळीराम देशमुख (ग्रामपंचायत सदस्य) आणि बालाजी तुकाराम शेंडगे (ग्रामपंचायत सदस्य), सर्व रा. ढोकरी, ता. तुळजापूर यांनी संबंधित खड्डा सुरक्षित न करता निष्काळजीपणा केला.

तसेच खड्डा बुजविण्याबाबत सूचना करूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी दिव्या पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# महाराजस्व अभियानात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

**खुलताबाद :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना, खुलताबाद प्रकल्पाच्या वतीने विविध शासकीय योजना, पोषण, आरोग्य व बालविकासविषयक उपक्रमांचे आकर्षक प्रदर्शन आणि माहितीपर स्टॉलचे आयोजन करण्यात आले. २ ऑगस्ट रोजी खुलताबाद येथील यशोदा लॉन्स येथे झालेल्या या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.






प्रदर्शनामध्ये संरक्षणात्मक, ऊर्जावर्धक व शरीरवर्धक आहाराचे महत्त्व, गरोदर व स्तनदा माता तसेच ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी आवश्यक पोषण आहार, विविध पौष्टिक पाककृती आणि स्थानिक अन्नधान्यांपासून पौष्टिक आहार तयार करण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यासोबतच 'नवचेतना' व 'आधारशिला' उपक्रमांतील विविध कृतींचेही सादरीकरण करण्यात आले.

अंगणवाडी सेविका व मातांनी तयार केलेल्या शैक्षणिक अध्ययन-अध्यापन साहित्याची (टीएलएम) आकर्षक मांडणी करण्यात आली. 'भविष्याचे झाड', 'टिकली चार्ट', संवेदनशील पालकत्व, बालसंगोपन, बालविकास आणि प्रारंभिक शिक्षण या विषयांवरील उपक्रमांद्वारे उपस्थितांना प्रभावी संदेश देण्यात आला.

या प्रदर्शनाला आमदार प्रशांत बंब यांनी भेट देऊन विविध उपक्रमांची माहिती घेतली. 'भविष्याचे झाड' या उपक्रमात सहभाग नोंदवत त्यांनी सुदृढ व सुसंस्कारित भावी पिढी घडविण्यासाठी अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले. अंगणवाड्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. तसेच प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे छायाचित्रे, माहिती व सादरीकरणाच्या माध्यमातून प्रभावी दस्तऐवजीकरण करण्याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी सभापती सुनीता संजय खंडागळे, उपसभापती मंदा बद्रीनाथ वाकळे, जिल्हा परिषद सदस्या रेखा प्रकाश चव्हाण, प्रतीक्षा विकास कापसे, योगिता नारायण बर्डे, दिनेश आंभोरे, प्रकाश वाकळे, एल. जी. गायकवाड, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष परसराम बारगळ आदी मान्यवरांनी स्टॉलला भेट देऊन उपक्रमांचे कौतुक केले.

हा उपक्रम बाल विकास प्रकल्प अधिकारी एस. के. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पर्यवेक्षिका संगीता काथार व द्रौपदी रोकडे यांच्या समन्वयातून यशस्वीपणे पार पडला. अंगणवाडी सेविका, मदतनीस, माता व लाभार्थी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या प्रदर्शनाच्या माध्यमातून पोषण, आरोग्य, पूर्वप्राथमिक शिक्षण, संवेदनशील पालकत्व, बालकांचा सर्वांगीण विकास, 'लेक लाडकी' योजना आणि 'प्रधानमंत्री मातृत्व वंदना' योजनेची प्रभावी माहिती नागरिकांपर्यंत पोहोचली. समाजाच्या सहभागातून सुदृढ, निरोगी आणि सक्षम भावी पिढी घडविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## अभिजीत गायकवाड यांची 'मंत्रालय MIS समन्वयक' पदी नियुक्ती



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागामार्फत 'विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी मिशन (ग्रामीण)' (VB-G RAM G) अंतर्गत नुकत्याच स्थापन करण्यात आलेल्या 'महा वृक्षलागवड कक्ष' मध्ये श्री अभिजीत भाऊसाहेब गायकवाड यांची मंत्रालय MIS समन्वयक या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यात राबविण्यात येत असलेल्या ३०० कोटी वृक्षारोपण मोहिमेचे (२०२६-२०४७) प्रभावी नियोजन, समन्वय, माहिती संकलन, प्रगतीचा आढावा आणि अहवालनिर्मिती करण्याचे महत्त्वाचे कामकाज या कक्षाद्वारे चालणार आहे.*

## गंगापूर रा.स्व. संघ शाखेत गुरुवारी गुरुपौर्णिमा उत्सव

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.४:** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गंगापूर शाखेकडून गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येत आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गुरुपौर्णिमा उत्सव गंगापूर येथील स्वर्गीय ताराचंदजी गंगवाल दिगंबर जैन मंगल कार्यालय येथे गुरुवार दिनांक ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसहा वाजता साजरा होणार आहे.

या कार्यक्रमासाठी रमेशजी पांडव प्रमुख वक्ते म्हणून लाभले आहेत. कार्यक्रमासाठी संघ स्वयंसेवकांनी संघाचा गणवेश परिधान करून कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन नगर कार्यवाह सुनील चक्रे यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे कळविले आहे.

## नवीन क्रोमबुक सीएक्स15 सादर

**पुणे :** तैवानची आघाडीची तंत्रज्ञान कंपनी एसुसने आज भारतात नवीन एसुस क्रोमबुक सीएक्स15 (सीएक्स1505सीटीए) सादर केले. विद्यार्थी, युवा व्यावसायिक तसेच प्रथमच लॅपटॉप खरेदी करणाऱ्या ग्राहकांना सहज, क्लाउड-आधारित संगणकीय अनुभव उपलब्ध करून देण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या या नव्या उपकरणामुळे एसुसच्या भारतातील क्रोमबुक उत्पादन श्रेणीत आणखी एक महत्त्वाची भर पडली आहे. क्रोमओएसवर आधारित आणि गुगल एआयच्या स्मार्ट क्षमतांनी अधिक सक्षम बनविण्यात आलेले एसुस क्रोमबुक सीएक्स15 हलक्या आणि मजबूत डिझाइनमध्ये विश्वासार्ह दैनंदिन कार्यक्षमता, स्मार्ट उत्पादकता, प्रभावी मनोरंजनाचा अनुभव आणि एंटरप्राइझ-स्तरीय सुरक्षा प्रदान करते. या लॅपटॉपची किंमत ₹ 47,990 असून, तो देशभरातील एसुस एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स (एईएस), आरओजी स्टोअर्स, एसुसचे अधिकृत रिटेल भागीदार, रिलायन्स डिजिटल, एसुस ई-शॉप आणि इतर प्रमुख किरकोळ विक्री केंद्रांवर उपलब्ध असेल.

## अहिल्यानगर मान्सून हेल्थ वॉच

**अहिल्यानगर :** अहिल्यानगरमध्ये पावसाळा सुरू झाला असून या काळात डेंग्यू, मलेरिया, ताप आणि इतर संसर्गजन्य आजार सामान्यतः वाढतात. याच पार्श्वभूमीवर स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (NSE: STARHEALTH; BSE: 543412) या भारतातील आघाडीच्या स्वतंत्र आरोग्य विमा कंपनीने राज्यभरात आपली पावसाळी आरोग्य सेवा मोहीम अधिक तीव्र केली आहे. स्टार हेल्थच्या आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या महाराष्ट्रातील आकडेवारीनुसार, ताप आणि संसर्गजन्य आजारांसाठी होम हेल्थकेअर सेवेचा वापर करणाऱ्यांच्या संख्येत पाच पटीने वाढ झाली आहे. या वाढीसोबत, कंपनीने देशभरात नुकत्याच सुरू केलेल्या व्हर्च्युअल ओपीडी सेवेलाही अभूतपूर्व मागणी मिळाली आहे, ग्राहक वैद्यकीय सल्ल्यासाठी पहिली पायरी म्हणून या सेवेला मोठ्या प्रमाणावर पसंती देत आहेत.

## सनकाइंड इंडियाला 250 मेगावॅट सोलर ईपीसी ऑर्डर्स

पुणे - सनकाइंड इंडिया लिमिटेड या एकात्मिक नवीकरणीय ऊर्जा ईपीसी आणि स्वच्छ ऊर्जा सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने जुलै २०२६ पर्यंत एकूण जवळपास २५० एमडब्ल्यूपीच्या अनेक डिस्ट्रीब्युटेड ओपन ॲक्सेस सोलर ईपीसी ऑर्डर्स मिळवल्या आहेत. हे प्रकल्प छत्तीसगड, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब आणि तमिळनाडूमधील स्टील, पॅकेजिंग, उत्पादन आणि स्वतंत्र वीज उत्पादक विभागांमधील व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांमध्ये पसरलेले आहेत, ज्यामुळे कंपनीचे ऑर्डर बुक आणि संपूर्ण भारतातील अंमलबजावणीचे जाळे अधिक दृढ झाले आहे. या नवीन ऑर्डर्समुळे ऊर्जेचा खर्च सुलभ करणे, ऊर्जा सुरक्षा वाढवणे आणि आपले शाश्वततेचे उद्दिष्ट पुढे नेऊ इच्छिणाऱ्या व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडून डिस्ट्रीब्युटेड ओपन ॲक्सेस नवीकरणीय ऊर्जेचा वाढता स्वीकार अधोरेखित होतो.

## फोल्डेबल स्मार्टफोन मालकीचा अडथळा दूर केला

गुरुग्राम - - सॅमसंग गॅलेक्सी झेड फोल्ड८ अल्ट्रा, गॅलेक्सी झेड फोल्ड८ आणि गॅलेक्सी झेड फ्लिप८ साठी ३०-महिन्यांच्या नो-कॉस्ट ईएमआय पर्यायांच्या लाँचसह प्रीमियम स्मार्टफोन मालकीला नव्या उंचीवर घेऊन जात आहे, ज्यामुळे सॅमसंगच्या आधुनिक फोल्डेबल नाविन्यता सुलभपणे उपलब्ध होत आहेत. मासिक मालकीचा अडथळा कमी करण्यासाठी डिझाइन केलेले नवीन फायनान्सिंग पर्याय अधिकाधिक ग्राहकांना शून्य डाऊन पेमेंटसह गॅलेक्सी एआयद्वारे समर्थित सॅमसंगच्या नवीन गॅलेक्सी झेड सिरीजचा अनुभव घेण्याची सुविधा देतो. फोल्डेबल नाविन्यतेचे सात जनरेशन्स आणि ग्राहकांच्या अभिप्रायावर डिझाइन केलेली सॅमसंगची नवीन गॅलेक्सी झेड सिरीज हिंग डिझाइन, डिस्प्ले, टिकाऊपणा आणि कार्यक्षमतेमध्ये उत्कृष्ट अभियांत्रिकीसह विशेष हेतूने बनवलेले गॅलेक्सी एआय एकत्रित करून आतापर्यंतचा सर्वात परिष्कृत फोल्डेबल अनुभव देते.

## एचडीएफसी बँके तर्फे बचत खात्यांच्या श्रृंखलेत वाढ

मुंबई- एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे दोन नवीन सेव्हिंग्ज अकाऊंट्सची सुरुवात केल्याची घोषणा केली. 'मॅक्स फॉर सिनियर्स' आणि 'मॅक्स फॉर हर' अशी ही दोन उत्पादने असून याचा लाभ अनुक्रमे वरिष्ठ नागरिक आणि महिलांसाठी होणार आहे. विशिष्ट विभागांसाठी ही उत्पादने त्यांच्या महत्त्व पूर्ण अशा सेव्हिंग्ज मॅक्स श्रेणीतील असून ही श्रेणी प्रेफर्ड एन्ट्री लेव्हल सेव्हिंग्ज अकाऊंट्स पैकी असतील. नुकत्याची पीआयबी च्या रिपोर्ट नुसार भारतातील वरिष्ठ नागरिकांची लोकसंख्या ही २०३६ पर्यंत २३० दशलक्षांवर पोहोचणार आहे, म्हणजेच संपूर्ण लोकसंख्येच्या १५ टक्के ही आकडेवारी असेल.

## 'एआय साथी फॉर एज्युकेटर्स'ची घोषणा

**मुंबई:** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) आणि कोटक एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 14 जुलै 2026 रोजी मंत्रालयात 'एआय साथी फॉर एज्युकेटर्स' या उपक्रमाची घोषणा करण्यात आली. माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे यांच्या हस्ते या एआय साथी अभ्यासक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे मुख्य सचिव श्री. रणजित सिंह देवल, शिक्षण आयुक्त श्री. सचिंद्र प्रताप सिंह, एससीईआरटीचे संचालक डॉ. हेमंत वासेकर, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे, माध्यमिक शिक्षण संचालक श्री. महेश पालकर, प्राथमिक शिक्षण संचालक श्री. शरद गोसावी, एससीईआरटीच्या उपसंचालक सौ. वर्षाराणी भोपळे, उपविभाग प्रमुख श्री. राजेंद्र वाकडे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे उपविभागप्रमुख डॉ. संदीप मुळे तसेच कोटक एज्युकेशन फाउंडेशनतर्फे सौ. अलका पागारे, श्री. मिलिंद पांडे आणि श्री. दीपक पाठक हे उपस्थित होते.

## टि.सी. हरवली आहे

माझी कु. प्रतिक्षा बालाजी पाटील या नावाची ११ वी पासची टि.सी. हिमायतनगर ते नांदेड बस प्रवास करताना हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर आणून द्यावी.

पत्ताः कु. प्रतिक्षा बालाजी पाटील मु.पो. हिमायतनगर ता. हिमायतनगर जि.नांदेड मो. ९४२३७१०५४३

## लायन्स क्लब–गोल्डचा 19 वा पदग्रहण सोहळा उत्साहात

### आशिष छाबडा अध्यक्षपदी; नव्या कार्यकारिणीने स्वीकारला पदभार

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर–गोल्ड (डिस्ट्रिक ३२३४ एच-२) चा १९ वा पदग्रहण सोहळा शनिवारी (१ ऑगस्ट) चिकलठाणा येथील खिवंसरा बिझनेस सेंटरमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. लायनिस्टिक वर्ष २०२६-२७ साठी अध्यक्ष म्हणून लायन आशिष छाबडा, सचिव म्हणून लायन सुनील पांडे आणि कोषाध्यक्ष म्हणून लायन राजेंद्र ठोले यांनी पदभार स्वीकारला.




कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पीएमजेएफ लायन दत्तात्रय औसेकर उपस्थित होते. माजी मल्टिपल कौन्सिल चेअरमन एमजेएफ लायन सुनील देसरडा यांनी पदग्रहण अधिकारी म्हणून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शपथ दिली, तर रिजन चेअरमन एमजेएफ लायन किशोर ललवाणी यांनी नवीन सदस्यांना क्लबमध्ये प्रवेश दिला. माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर एमजेएफ लायन राजेश राऊत व एमजेएफ लायन तनसुख झांबड यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना एमजेएफ लायन सुनील देसरडा यांनी समाजसेवा ही लायन्स चळवळीची ओळख असून, लायन्स क्लब–गोल्डने सातत्याने राबविलेल्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. अध्यक्ष आशिष छाबडा यांच्या नेतृत्वाखालील नवीन कार्यकारिणी सेवाकार्यात नवे आदर्श निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रथम उपाध्यक्ष लायन सुबोध जाधव, द्वितीय उपाध्यक्ष लायन आनंद भागेरिया, सहसचिव लायन किरण पाटणी, सहकोषाध्यक्ष लायन महेंद्र रावका यांच्यासह संचालक मंडळातील सदस्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन लायन सीमा रावका व लायन पूजा गोधा यांनी केले, तर सूत्रसंचालन लायन रचना दशरथे आणि लायन राहुल दशरथे यांनी केले.

## खुलताबाद येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी येथील कोहिनूर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवार दिनांक एक ऑगस्ट रोजी मराठी विभागाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 106 व्या जयंतीनिमित्त व भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या 106 व्या पुण्यतिथी निमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉ. निलेश देगावकर यांनी साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे व भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवन कार्य व साहित्यावर सविस्तर प्रकाश टाकला. तसेच मराठी विभागाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी लेखन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन व लेखन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश देवडे यांनी केले तर आभार प्रा. शांतीलाल गायकवाड यांनी मानले यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रफीउल्लाह खान , डॉ. सुभाष जिते तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीव विद्यार्थी उपस्थित होते.

## 35 वर्षानंतर भेटले जिल्हा परिषद प्रशाला शाळा सोयगाव येथील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ ऑगस्ट

जगप्रसिद्ध अजिंठा लेणीच्या निसर्गरम्य परिसरात वसलेल्या सोयगावच्या जिल्हा परिषद प्रशालेच्या सन. १९९१ बॅच च्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन अजिंठा लेणीजवळ असलेल्या ॲपल हॉटेल फर्दापूर येथे मोठ्या उत्साहात पार पडले.स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने 35 वर्षानंतर भेट झालेल्या माजी विद्यार्थी विद्यार्थिनींची संख्या ७० इतकी होती.यात विद्यार्थी नींची संख्या लक्षणिय होती.




कितीतरी वर्षांनी आपल्या वर्गमित्र मैत्रिणी यांना भेटून खुप आनंद झाला. आनंद व्यक्त करतांना अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.या कार्यक्रमाची सुरूवात या बॅच मधील काळाने घेऊन गेलेल्या मित्र व गुरूजन यांना एक मिनिट श्रद्धांजली वाहण्यात आली.

यानंतर सर्वांनी आपला वैयक्तिक परिचय,संध्याची प्रगती, कौटुंबिक माहिती,तसेच शालेय जीवनातील गमती जमती सांगून खळखळून सर्वांना हसविले. एकमेकांना आपल्या टोपन नावाने हाका मारल्या.कडकडून मिठी मारली आणि हे आनंदाचे अनमोल क्षण आपल्या डोळ्यात व कॅमेऱ्यात टिपले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोयगावचे नाट्य कलावंत सुनिल गुजर यांनी आपल्या खास खुमासदार विनोदी शैलीत मिमिक्री करत कार्यक्रमात रंगत आणली. सहभोजनानंतर सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला

या कार्यक्रमासाठी जळगाव,जामनेर,सिल्लोड,बुलडाणा, नाशिक,मुंबईत,पुणे, छत्रपती संभाजीनगर तसेच इतर शहरांमधून उपस्थिती होती.

या स्नेहसंमेलनासाठी ज्ञानेश्वर(बाळू) बोरसे-पाटील, दुबई हून उपस्थित कांचन पाटील,समाजसेवक अरूण सोहनी,डॉ. नाना पायघन,प्रफुल्ल महानोर,अरूणा चौधरी, संजय चौधरी,संजय जोहरे,मंगेश पाटील,निरंजन छानवाल, गोपाल दुसाने,डॉ. सुरेश शिंदे,विनोद खोडपे,साधना काळे, उज्वला काळे,रघुनाथ काटोले,वैशाली पाटील,गोकूळ रोकडे,दिपक देशमुख,सुभाष सोहनी,विजय व्यवहारे,दिपक राजपूत,सुनिल कळवत्रे,महेश जोशी,अशोक पाटील,अर्चना अंबिलवादे,मनिषा सरोदे,समाधान चौधरी,गजानन वाडेकर, विजय वामने,शांताराम बडक,दिगंबर भोकरे,गणेश मालोदे, भगवान भोकरे,रवि बाविस्कर,विनोद काळे आदीसह उपस्थित होते.

या स्नेहसंमेलनासाठी बाळू बोरसे,कांचन पाटील,प्रफुल्ल महानोर आणि सोयगावमधील वर्गमित्र यांनी परिश्रम घेतले.

तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील गुजर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ.नाना पायघन यांनी मानले.

## एमजीएममध्ये फॉरेन्सिक सायन्स विभागाच्या दीक्षारंभ कार्यक्रमास सुरुवात

**छत्रपती संभाजीनगर, दि.४ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ बेसिक अँड अप्लाईड सायन्सेसच्या फॉरेन्सिक सायन्स विभागाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षे २०२६ – २७ वर्षाच्या विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ कार्यक्रमास सुरुवात झाली असून आज जनसंपर्क अधिकारी श्रीकांत येरूळे यांचे 'एज्युकेशन बियॉन्ड अ डिग्री : बिल्डिंग रिस्पॉन्सिबल सिटिझन्स अँड बेटर ह्यूमन बीइंग्स' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. यावेळी विभागप्रमुख डॉ.मोईनुद्दीन सिद्दीकी, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना जनसंपर्क अधिकारी श्रीकांत येरूळे यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहून ती साकार करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्याचे आवाहन केले. पदवीबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधन, प्रमाणपत्र अभ्यासक्रम, एनएसएस, एनसीसी, नेतृत्वगुण आणि अभ्यासक्रमाबाहेरील उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. इन्स्टाग्राम आणि फेसबुकसारख्या मनोरंजनप्रधान माध्यमांपेक्षा लिंक्डइनसारख्या व्यावसायिक माध्यमांचा वापर वाढवण्याचा सल्ला देत त्यांनी व्यायाम, योग, प्राणायाम, वाचन आणि सातत्य या सवयी अंगीकारण्याचे महत्त्व अधोरेखित केले. पदवी सर्वांनाच मिळते; मात्र आपले व्यक्तिमत्त्व हे आपल्याला स्वतः घडवावे लागते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना स्क्रीनचा वाढलेला वेळ हा आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी व्यतीत करण्याचा, संदेश दिला. विद्यार्थ्यांना जबाबदार भारतीय नागरिक आणि चांगला माणूस बनण्याचे आवाहन करताना वाहतुकीचे नियम पाळणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, मतदानाचा हक्क बजावणे, सार्वजनिक ठिकाणी रांगेत उभे राहणे, कचरा हा कचराकुंडितच टाकणे, कुठेही न थुंकणे आणि कायद्याचा आदर करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

## साईबाबांच्या उत्सवात कर्नाटक राज्यातील साईभक्त एस प्रकाश यांची मोफत फुलांच्या सजावटीची अनोखी सेवा !

शिर्डी (प्रतिनिधी) आषाढी एकादशी तसेच गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त सलग आठ वर्षापासून साई मंदिर व परिसरात मोफत आकर्षक फुलांची सजावट करून साईबाबांच्या चरणी आपली सेवा रुजू करणार कर्नाटक राज्यातील चिकबल्लपुर येथील साईभक्त एस प्रकाश यांच्या मोफत सेवेची व कलेची ग्रामस्थ व भाविकांकडून कौतुक केले जात आहे.

साईबाबा विषयी असलेली श्रद्धा व त्यांच्या आशीर्वादामुळे व्यवसाय होणारी प्रगती यासाठी आपण साई दरबारात साईंच्या उत्सव काळात मोफत सेवा द्यावी असे कर्नाटक राज्यातील साईभक्त एस प्रकाश यांची गेल्या अनेक वर्षापासून इच्छा होते परंतू साईबाबांच्या इच्छेपुढे कोणाचे काही चालत नाही इच्छा झाल्यानंतरच साईबाबा भक्तांना या ठिकाणी बोलावतात असे अनेक भाविकांना प्रचिती आल्याचे बघायला मिळाले बाबांविषयी असलेली श्रद्धा याबाबत सांगताना साई भक्त एस प्रकाश म्हणाले

**२००७ मध्ये जेव्हा मी पहिल्यांदा बाबांच्या दर्शनासाठी शिर्डीला गेलो होतो, तेव्हा मी मनापासून प्रार्थना केली होती:** "बाबा, मलाही कधीतरी तुमच्यासाठी सजावट करण्याची संधी द्या..

२०१५ पासून मी गौरीबिदनूरमधील स्थानिक मंदिरांमध्ये मोफत सजावटीचे काम करत होतो. २०१५ मध्ये मी शिर्डी येथील प्रशासकीय कार्यालयात जाऊन सजावट करण्याची संधी देण्याची विनंती केली. बाबांच्या कृपाशीर्वादाने मला आषाढी एकादशीच्या दिवशी सजावट करण्याची संधी मिळाली आणि पुढे सलग ८ वर्षे मी ही सेवा करत राहिलो.

आणि यावर्षी गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त बाबांच्या आशीर्वादाने मला साई मंदिरात व परिसरात फुलांची सजावट करण्याची सुवर्णसंधी मिळाली.

ही माझ्यासाठी केवळ सजावट नाही तर माझी सेवा, माझी श्रद्धा आणि बाबांशी जोडले गेलेले नाते आहे.

या गुरुपौर्णिमेची सजावट आम्ही विचार केला होता त्यापेक्षाही अधिक सुंदर झाली. खरोखरच आमच्या अपेक्षेपेक्षा कितीतरी पटीने उत्कृष्ट झाली.

शिर्डी संस्थानाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपकार्यकारी अधिकारी दराडे, प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्ष कैलास कोते, राष्ट्रवादीचे नेते रमेश गोंदकर, गजानन शेरवेकर, साई नागरी पतसंस्थेचे चेअरमन अशोकराव कोते, मंदिर प्रमुख विष्णुपंत थोरात व संस्थांचे विविध विभागाचे अधिकारी तसेच कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे मला साईचरणी उत्सवा दरम्यान फुलांची सजावट करण्याची सेवा मिळाली असे त्यांनी सांगितले.

### जाहीर प्रगटन

**मेहेरबान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड (श्रीमती आर. एस. तापडिया) यांच्या कोर्टात**

दिवाणी अर्ज क्र- ३१३/२०२६ पु. तारीख - २९.०९२०२६

अर्जदार :- १. नितीन पिता ज्ञानेश्वर दाभाडे, वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा.मु. हिवरखेडा गौताळा ब्राम्हणी गराडा, ब्राम्हणी ता. कन्नड जि. औरंगाबाद २. अमोल पिता ज्ञानेश्वर दाभाडे, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा.मु. हिवरखेडा गौताळा ब्राम्हणी गराडा, ब्राम्हणी ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. दिपाली भ्र. अरुण पवार, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा.पो. बाल्हेगांव माणेगांव शिवार, ता. जि. औरंगाबाद ४. मिरा भ्र. ज्ञानेश्वर दाभाडे, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा.मु. हिवरखेडा गौताळा पो. ब्राम्हणी ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

अर्ज :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी तमाम जनतेस कळवीण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ४ यांनी ॲड.ए.ए. शेख कन्नड यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज सादर केला की,

मयत ज्ञानेश्वर पिता दामु दाभाडे हे अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडील असुन अर्जदार क्रं. ४ ही मयत ज्ञानेश्वर पिता दामु दाभाडे यांची पत्नी आहे. मयत ज्ञानेश्वर पिता दामु दाभाडे हे दि.०७.१२.२०२४ रोजी मौजे हिवरखेडा गौताळा ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे मयत झाले आहे. मयत ज्ञानेश्वर पिता दामु दाभाडे यांना अर्जदारांच्या व्यतीरीक्त ईतर कोणीही कायदेशीर वारस नाही. ज्ञानेश्वर पिता दामु दाभाडे हे मयत झाल्यामुळे त्यांच्या पश्चात शासकीय कामे करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय, तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय, महसुल कार्यालय, ईतर शासकीय व निम शासकीय कार्यालयात कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्र आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. ज्यामुळे अर्जामध्ये कायदेशीर वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जामध्ये केली आहे.

त्याअर्थी सदरील अर्जाबाबत कोणाचा काही उजर आक्षेप असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत कोर्टात सादर करावा कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन अर्जदार नं. १ ते ४ च्या हक्कात कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन

दिनांक - ०१/०८/२०२६

आदेशावरुन

क. लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाम्पी न्यालाधीश, क. स्तर, कन्नड

### // जाहिर प्रगटन //

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १६८/२०२६.

अर्जदार :- १. लिलाबाई सुरतसिंग पाटील, वय, ७७ वर्षे, धंदा. घरकाम, २. कुलदिप सुरतसिंग पवार, वय. ४७ वर्षे, धंदा. मजुरी, रा. रवळा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. ३. प्रदिपसिंग सुरतसिंग पाटील, वय. ५४ वर्षे, धंदा. मजुरी, रा. आठवडे बाजार, फत्तेपुर, ता. जामनेर, जि. जळगांव. ४. प्रतिभा गोपालसिंग चव्हाण, वय. ६३ वर्षे, धंदा, घरकाम, रा. हिंगणा, ता. खामगांव, जि. बुलढाणा. ५. विद्या अशोक पाटील, वय. ५७ वर्षे, धंदा. घरकाम, रा. प्लॉट नं. २६, वाकिरोड, परिजातक कॉलनी, जामनेर, ता. जामनेर, जि. जळगांव. ६. सुनिता सुरतसिंग पाटील, वय. ५१ वर्षे, धंदा. घरकाम, आदर्शनगर रोड, खामगांव, ता. खामगांव, जि. बुलढाणा. ७. वंदना नंदकिशोर चव्हाण, वय. ५६ वर्षे, धंदा. घरकाम, रा. कांचननगर, अंबडरोड, जालना ता. जि. जालना.

८. अरुणा प्रदिप पाटील, वय. ४८ वर्षे, धंदा. घरकाम, रा. कर्णफाटा, ता. जामनेर, जि. जळगांव.

९.सुवर्णा प्रमोद सुरडकर-मयत-वारस :- प्रमोद तेजाबसिंग सुरडकर, वय. ५४ वर्षे, धंदा. मजुरी. अ. श्रद्धा प्रमोदराव सुरडकर, वय. २६ वर्षे, धंदा. घरकाम. ब. क श्रुती प्रमोद सुरडकर, वय. २१ वर्षे, धंदा. घरकाम, सर्व रा. विद्यासागर अपार्टमेंट, शिव कॉलनी, जळगांव, ता. जि. जळगांव

-विरुध्द-

गैरअर्जदार - कोणीही नाही.

प्रकरण - वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत सुरतसिंग अल्हडसिंग पाटील या दि. २७/११/२०२४ रोजी मौजे. रवळा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ९ हे सुरतसिंग अल्हडसिंग पाटील यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :-०७/०९/२०२६. आज दि. ०४/०८/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन,

विभागीय लिपीक, | अधिक्षक,

दिवाणी न्यायालय, क. स्त, सोयगांव

## संपादकीय

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

### अग्रलेख

# धर्मो रक्षति रक्षितः

कोणत्याही प्रलोभनाद्वारे किंवा फसवणुकीने धर्मांतर घडवून आणणाऱ्या प्रवृत्ती सामाजिक वीण बिघडविण्यास कारणीभूत ठरतात असे अनेकदा दिसून आले आहे. त्यामुळे, धर्मांतर ही सांस्कृतिक घडी बिघडविणारी कृती आहे, हे एकदा मान्य केले, की आपोआपच प्रत्येकास आपल्या धर्माचे आचरण करण्याचा हक्क अबाधित राखता येतो. प्रलोभने दाखवून किंवा बळाचा, पैशाचा वापर करून किंवा निव्वळ काही रूढींच्या गैरवापरामुळे निर्माण झालेल्या समजुतींचा धाक दाखवून धर्मांतरे घडविण्याचे प्रकार केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात अनेक राज्यांमध्ये घडले असले, तरी अशा धर्मांतराने कोणाचेच काही भले झाल्याची उदाहरणे नाहीतच, उलट समाजाचे स्वास्थ्य बिघडण्यापलीकडे अशा धर्मांतरातून काहीही साध्यदेखील झालेले नाही. त्यामुळे, अशा रीतीने धर्मांतरे घडवून आणण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी आणि आपल्या पारंपरिक जीवनशैलीने आखून दिलेली जीवनाची वाटचाल निर्धोकपणे करण्यासाठी अशा कृतींना पायबंद घालणे गरजेचेच होते. त्यामुळेच, महाराष्ट्रात धर्मस्वातंत्र्य कायदा किंवा सक्तीच्या धर्मांतरविरोधातील कायदा संमत झाला ही राज्याच्या कायदेशीर व राजकीय पटलावरील अत्यंत महत्त्वपूर्ण बाब ठरली आहे. या कायद्याला राष्ट्रपतींनी मंजुरी दिल्याने आता राज्यात सर्वांनाच मुक्तपणे व निर्भयतेने आपल्या धर्माचे आचरण करता येईल. अर्थात, बळजबरीने किंवा आमिष दाखवून होणाऱ्या धर्मांतराला आळा घालण्याच्या उद्देशाने आणलेल्या या कायद्याभोवती मोठे सामाजिक व राजकीय वादंग निर्माण झाले असले, तरी त्यामागील राजकीय हेतू नजरेआड करून सांस्कृतिक, पारंपरिक आणि सामाजिक जीवनशैलीशी निगडित असलेल्या पैलूंचा विचार केल्यास, हा कायदा अस्तित्वात येणे ही जीवनशैली अबाधित राखण्यासाठीची गरजच होती यामध्ये दुमत असणार नाही.

मानवी जीवन ही केवळ कौटुंबिक कर्तव्यांची किंवा जगण्याच्या संघर्षातील रोजच्या धावपळीची केवळ एक साखळी नसते. जीवनशैलीला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या संस्कृती नावाच्या एका अदृश्य धाग्याने या जीवनशैलीला बांधलेले असते आणि धर्म हा संस्कृतीचा आत्मा असतो असे म्हटले जाते. धर्माचरणाचे नाते थेट जीवनशैलीशी जोडले गेलेले असल्याने, आजच्या रूढ अर्थाने ज्याकडे कर्मकांड किंवा पूजापठानापुरतेच पाहिले जाते, त्याहूनही धर्म या संकल्पनेचा अर्थ व्यापक आहे. आजकाल, धर्माबाबतच्या काही संकुचित समजुतींमुळे, केवळ कर्मकांड किंवा उपासनापद्धतींचे आचरण म्हणजे धर्माचरण असे मानले जात असले, तरी ते खरे नाही. धर्म ही केवळ पूजा पद्धती नाही, तर संपूर्ण समाजात शिस्त, दिशा आणि अर्थ देणारी ती एक जीवनशैली आहे. धर्म विचार पेरतो, तर संस्कृती ते विचार आचरणात आणण्याचे संस्कार घडविते. या दोन्ही बाबी जेव्हा एका विशिष्ट शिस्तीत अमलात आणल्या जातात, तेव्हा धर्म आपल्या जीवनशैलीत श्वासासारखा मिसळून जातो. असे धर्माचरण, संस्कृती आणि जीवनशैली यांच्यातील परस्पर संबंध समाजाच्या वाटचालीत प्रत्येक पावलावर जाणवतो. सण, उत्सव साजरे करण्यामागील काही शास्त्रीय कारणे पाहिली, तर धर्माच्या संस्काराचे सामाजिक महत्त्व स्पष्ट होते. त्यामुळे, धर्म ही केवळ जीवनशैलीशी नव्हे, तर भौगोलिकतेशीदेखील जोडली गेलेली बाब ठरते. पाश्चात्त्य देशांतील धर्माचरणाच्या परंपरा येथील भौगोलिकतेशी जुळतीलच असे नसते. धर्माच्या संस्काराची शिकवण म्हणून सांगितली जाणारी प्रत्येक गोष्ट माणसाला निसर्गाशी आणि कुटुंबाशी जोडून ठेवणारी जीवनपद्धती शिकवते, हे भारतीय संस्कृतीशी जवळचे नाते असलेल्या धर्माने दाखवून दिले आहे. त्यामुळे, धर्म ही कोणतीही लादली जाणारी गोष्ट नाही. मानवी समाजाला एकत्र बांधून ठेवणारी आणि त्याला सांस्कृतिक अधिष्ठान देणारी ती एक नैसर्गिक गरज आहे. ज्या संस्कृती आपल्या धार्मिक व सांस्कृतिक मुळांपासून दूर गेल्या त्यांनी आपली सामाजिक ओळख आणि नैतिक पाया गमावला असे जागतिक समाजव्यवस्थेत दिसून येते. त्यामुळे, संस्कृती आणि धर्माचे रक्षण करणे म्हणजे एका समृद्ध जीवनशैलीचा वारसा आपल्या भावी पिढ्यांसाठी जतन करणे ही भारताच्या संस्कृतीची शिकवण आहे. जेव्हा धर्माची मुळे निखळतात, तेव्हा त्याच्याशी जोडलेली संस्कृतीही ढासळते. यामुळे, प्रलोभने, फसवणूक किंवा बळजबरीने होणाऱ्या धर्मांतराला अटकाव करणे ही केवळ एक कायदेशीर बाब उरत नाही, तर ती कोणत्याही समाजाची सांस्कृतिक आणि सामाजिक स्वायत्तता टिकवून ठेवण्यासाठीची एक अपरिहार्य गरज बनते. कारण, कोणत्याही राष्ट्राच्या, समाजाच्या संस्कृतीचा प्रवाह पिढ्यानपिढ्यांच्या जगण्यातून, निसर्गाशी असलेल्या सहसंबंधातून आणि धार्मिक आचरणातून तयार होत असतो. भाषा, सण, साहित्य हे सारे जीवनपद्धतीचे अविभाज्य घटक आहेत. त्यामुळे, जेव्हा एखाद्या व्यक्ती, कुटुंब किंवा समूहाचे सक्तीने किंवा प्रलोभने दाखवून फसवणुकीने धर्मांतर घडविले जाते, तेव्हा अशा व्यक्ती, कुटुंबे किंवा समूहांची केवळ प्रार्थना किंवा पूजापद्धती बदलत नाही, तर त्यांच्या परंपरा, संस्कृतीशी जोडली गेलेली पिढ्यानपिढ्यांची नाळ तोडली जात असते आणि जेव्हा संस्कृतीशी असलेले नाते तोडले जाते, तेव्हा त्या समाजाच्या अस्मितादेखील कमजोर होतात, हा इतिहास आहे. जेव्हा एखादा समाज आपल्या मूळ संस्कृतीपासून तुटतो, तेव्हा त्याची सामाजिक ओळखही पुसली जाते. म्हणूनच, धर्मांतरबंदीचा कायदा ही त्या सामाजिक आणि सांस्कृतिक वारशाचे रक्षण करणारी संरक्षक ढाल ठरणार आहे. समाज जेव्हा एका सामायिक सांस्कृतिक धाग्याने बांधलेला असतो, तेव्हा त्यात एकोपा आणि परस्परविश्वास टिकून राहतो. संघटित आणि आक्रमक धर्मांतराच्या मोहिमांमुळे या सामाजिक रचनेला तडे जातात. सामाजिक सलोखा धोक्यात येतो. कौटुंबिक विघटन आणि सामाजिक तणाव वाढू लागतो. म्हणूनच, सामाजिक स्थिरता आणि शांतता अबाधित राखण्यासाठी धर्मांतरावर कायदेशीर बंधने असणे आवश्यक ठरते.

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचे आचरण करण्याचे आणि त्याचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. परंतु, असे स्वातंत्र्य म्हणजे धर्मपरिवर्तन करण्याचा परवाना नसतो. जिथे अज्ञानाचा, गरिबीचा, आजारपणाचा किंवा आर्थिक लाचेचा फायदा घेऊन धर्मांतर घडवले जाते, तिथे ते स्वातंत्र्य राहत नाही, तर तो एक प्रकारचा शोषणाचा मार्ग बनतो. बळजबरीने किंवा आमिष दाखवून केलेले धर्मांतर हे व्यक्तीच्या स्वेच्छेचा पराभव करते. अशा अनैतिक मार्गांना आळा घालणे म्हणजे खऱ्या अर्थाने नागरिकांच्या धार्मिक स्वातंत्र्याचे रक्षण करणे ठरते. या कायद्याने आता ही जबाबदारीदेखील संबंधित यंत्रणांच्या खांद्यावर दिली आहे. जगातील अनेक समाज आणि संस्कृती केवळ धर्मांतराच्या वादळात आपल्या मूळ अस्तित्वासह नामशेष झाल्या. आपल्या मूळ संस्कृतीशी आणि धर्माशी नाळ टिकवून ठेवली, तर काळाच्या ओघात आपले अस्तित्व सिद्ध करता येईल, हा विचार स्वीकारला, की धर्म ही केवळ वैयक्तिक बाब राहात नाही. ती एक सामाजिक गरज ठरते. त्यामुळे अनैतिक, छुप्या आणि बळजबरीच्या धर्मांतर पद्धतींच्या विरोधात अमलात येणाऱ्या या कायद्याची गरज आहे. महाराष्ट्राने ती गरज ओळखल्याने राज्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिकतेचे भविष्य सुरक्षिततेच्या भावनेने आश्वस्त झाले आहे. आपली संस्कृती, आपला इतिहास, आपल्या परंपरा आणि आपली सामाजिक रचना सुरक्षित ठेवण्यासाठी अशा कायद्याची कडक अंमलबजावणी होणे अत्यंत गरजेचे आहे. धर्म आणि संस्कृतीचे रक्षण करणे म्हणजे केवळ भूतकाळाचा अभिमान बाळगणे नव्हे, तर आपल्या भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करणे होय. म्हणूनच, धर्मांतरबंदी ही केवळ एक कायद्याची गरज नसून, ती आपल्या समाजाची आत्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक गरज आहे. ■

### आंतरराष्ट्रीय

# चीनमध्ये पुन्हा कोरोना; भारत सतर्क

**प्रा. जयसिंग यादव**

कोरोना महामारीला सुरुवात होऊन सहा वर्षांचा काळ उलटला असला, तरी कोविड-१९ हा इतिहासजमा झालेला आजार नाही, हे चीनमधून समोर आलेल्या नव्या आकडेवारीने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. चीनमध्ये गेल्या काही आठवड्यांमध्ये कोविड-१९ च्या रुग्णसंख्येत वाढ झाली असून ओमिक्रॉनचा एनबी १.८.१ हा उपप्रकार वेगाने पसरत आहे. जून महिन्यात चीनमध्ये कोरोनाचे जवळपास ७९ हजार नवे रुग्ण आढळले, पॉझिटिव्हिटी दर १६.३ टक्क्यांवर पोहोचला आणि यंदा प्रथमच कोविडने इन्फ्लूएंझालाही मागे टाकले, मात्र या वेळी परिस्थिती २०२० किंवा २०२१ सारखी भीषण नाही. बहुसंख्य रुग्णांमध्ये सौम्य लक्षणे असून मृत्यूचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे या घडामोडीकडे भीतीने नव्हे, तर सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या दृष्टीने एक गंभीर इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे. अर्थात परिस्थितीतील एक महत्त्वाचा बदल लक्षात घेतला पाहिजे. तीव्रता पूर्वीइतकी राहिली नसली तरी कोरोनाचा विषाणू अजूनही बदलत आहे. 'ओमिक्रॉन'च्या उपप्रकारांमुळे संसर्ग झपाट्याने होतो, मात्र गंभीर आजार होण्याचे प्रमाण कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे गेल्या काही वर्षांमध्ये जगातील मोठ्या लोकसंख्येला लसीकरणाचा लाभ झाला आहे. अनेकांना नैसर्गिक संसर्गही झाला आहे. त्यामुळे समाजात काही प्रमाणात सामूहिक प्रतिकारशक्ती निर्माण झाली आहे. याचा अर्थ धोका संपला आहे, असा होत नाही, पण आरोग्यव्यवस्थेची त्याचा सामना करण्याची क्षमता निश्चितच वाढली आहे, तरीही चीनमधील आकडे काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करतात.

उन्हाळ्यात कोविडची वाढ का झाली? यापूर्वी हिवाळा हा श्वसन संसर्गाचा हंगाम मानला जात होता. आता मात्र एअर कंडिशनर असलेल्या बंद जागांमध्ये अधिक वेळ घालवणे, पर्यटन आणि प्रवासात वाढ, तसेच बदलत्या हवामानामुळे विषाणूच्या प्रसाराचे स्वरूपही बदलले आहे. म्हणजेच कोविड आता ऋतूंवर अवलंबून राहिलेला नाही. तो वर्षभर अधूनमधून डोके वर काढू शकतो. त्यामुळे हिवाळ्यातच नव्हे, तर वर्षभर सार्वजनिक आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवावी लागणार आहे. यामधील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विषाणूचे उत्परिवर्तन.



प्रत्येक संसर्गासोबत विषाणूमध्ये लहान-मोठे बदल होत असतात. एनबी १.८.१ हा अशाच बदलांमधून निर्माण झालेला उपप्रकार आहे. आज तो तुलनेने सौम्य आहे; पण भविष्यातील प्रत्येक उपप्रकारही तसाच असेल, याची कोणतीही हमी नाही. कोविडच्या पहिल्या टप्प्यात अल्फा, त्यानंतर डेल्टा आणि मग ओमिक्रॉन या प्रकारांनी जगाला वेगवेगळ्या प्रकारे हादरवले. त्यामुळे जनुकीय तपासणी आणि विषाणूंच्या सततच्या निरीक्षणाला आजही तितकेच महत्त्व आहे. भारताच्या दृष्टीने सध्या घाबरण्याचे कारण नसले, तरी निष्काळजी राहण्याचेही कारण नाही. देशात सक्रिय रुग्णसंख्या अत्यल्प आहे. काही राज्यांमध्ये तुरळक रुग्ण आढळत असले, तरी रुग्णालयांवरील ताण वाढलेला नाही, परंतु भारतासारख्या १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशात कोणताही संसर्ग वेगाने पसरू शकतो. त्यामुळे सीमावर्ती तपासणी, विमानतळांवरील देखरेख, संशयित नमुन्यांचे जनुकीय विश्लेषण आणि राज्यांच्या आरोग्य यंत्रणांमधील समन्वय सातत्याने मजबूत ठेवणे गरजेचे आहे.

कोविडच्या काळात भारताने अनेक यशस्वी प्रयोग केले. कोविडसारखी डिजिटल लसीकरण व्यवस्था, मोठ्या प्रमाणावर लसींचे उत्पादन, कमी वेळात उभारलेली कोविड रुग्णालये, ऑक्सिजन उत्पादनातील वाढ आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे योगदान यामुळे भारताला जागतिक स्तरावर प्रशंसा मिळाली; मात्र दुसऱ्या बाजूला दुसऱ्या लाटेतील ऑक्सिजनचा तुटवडा, ग्रामीण भागातील अपुरी आरोग्य सेवा, रुग्णवाहिकांची कमतरता आणि खाजगी आरोग्य व्यवस्थेतील आर्थिक शोषणही तितकेच वास्तव होते. या अनुभवांतून कायमस्वरूपी सुधारणा झाल्या का, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. भारताच्या सार्वजनिक आरोग्य खर्चाचे प्रमाण आजही विकसित देशांच्या तुलनेत कमी आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये, संसर्गजन्य रोग संशोधन प्रयोगशाळा आणि प्रशिक्षित मनुष्यबळ यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीची आवश्यकता आहे. महामारी आली, की यंत्रणा उभारण्यापेक्षा शांत काळातच मजबूत पायाभूत सुविधा उभ्या करणे अधिक शहाणपणाचे ठरते. दुर्दैवाने भारतासह अनेक देशांमध्ये संकट ओसरले, की आरोग्य क्षेत्रावरील लक्ष कमी होते. कोविडने विज्ञान आणि समाज यांच्यातील नातेसंबंधाचाही कस लावला. महामारीच्या काळात अफवा, 'सोशल मीडिया'वरील दिशाभूल, बनावट औषधे, चमत्कारी उपचार आणि लसींबाबतच्या गैरसमजांनी मोठे नुकसान केले. विज्ञानावरील विश्वास डळमळीत करण्याचा प्रयत्न झाला. आज पुन्हा कोविडची चर्चा सुरू होत असताना समाजाने हा धडा विसरू नये. कोविडच्या सुरुवातीच्या काळात उशिरा माहिती देणे, संसर्गाचे खरे प्रमाण लपवणे आणि जागतिक संस्थांशी समन्वयाचा अभाव यावर अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. भविष्यात अशा चुका परवडणाऱ्या नाहीत. कोणत्याही देशात नवीन प्रकार आढळल्यास त्याची माहिती त्वरित जगासमोर ठेवणे, संशोधनासाठी नमुने उपलब्ध करून देणे आणि लस उत्पादकांशी समन्वय राखणे ही आता आंतरराष्ट्रीय जबाबदारी झाली आहे. कोविडने जागतिक अर्थव्यवस्थेचेही गणित बदलले. चीनमधील वाढती रुग्णसंख्या ही आजच्या घडीला महामारीची घंटा नाही; परंतु निष्काळजीपणाविरुद्धचा स्पष्ट इशारा आहे. विषाणू बदलतो, परिस्थिती बदलते आणि समाजालाही बदलावे लागते. कोविडचे भय कमी झाले असले, तरी त्याचे अस्तित्व संपलेले नाही. त्यामुळे घाबरण्यापेक्षा सजग राहणे, विज्ञानावर विश्वास ठेवणे, आरोग्य व्यवस्था सक्षम करणे आणि नागरिकांनी जबाबदार वर्तन करणे हीच भविष्यातील खरी रणनीती ठरेल.

कोरोनाने मानवजातीला मोठी किंमत मोजायला लावली. त्या अनुभवातून शिकून सार्वजनिक आरोग्य, संशोधन आणि नागरिकांची जागरूकता यांचा मजबूत पाया उभारला, तर कोविडचे पुनरागमन ही भीतीची नव्हे, तर तयारीची परीक्षा ठरेल. या परीक्षेत यशस्वी होणे हे केवळ सरकारचे नव्हे, तर संपूर्ण समाजाचे सामूहिक उत्तरदायित्व आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

### वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# श्रद्धा आणि परंपरेचा गौरव

महाराष्ट्र राज्याला अनेक सांस्कृतिक, धार्मिक आणि संत परंपरांचा वारसा लाभला आहे. या वारशामध्ये आणखी एक ऐतिहासिक भर पडली आहे. राष्ट्रीय स्तरावर मिळालेली ही नवी ओळख धार्मिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाची आहे. साडेतीन शक्तिपीठांपैकी प्रमुख पीठ असलेल्या तीर्थक्षेत्र माहूर गडावरील श्री रेणुकामाता मंदिरामध्ये देवीला नैवेद्य म्हणून अर्पण केल्या जाणाऱ्या पारंपरिक तांबूलला केंद्र सरकारने अधिकृत भौगोलिक मानांकन बहाल केले आहे. त्यामुळे माहूरचा तांबूल प्रसाद हा देशामध्ये तिरुपती देवस्थानमध्ये मिळणाऱ्या लाडूच्या प्रसादानंतर जीआय मानांकन मिळविणारा दुसरा तर महाराष्ट्रामध्ये पहिला मानांकनप्राप्त प्रसाद ठरला आहे. या यशामुळे माहूरच्या धार्मिक पर्यटनाला जागतिक स्तरावर फार मोठी गती मिळणार आहे. माहूरचा हा प्रसाद फार पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. हा प्रसाद लाखो भक्तांच्या आस्थेचाही विषय आहे. त्यावर केंद्र सरकारने शिक्कामोर्तबही केले आहे. या तांबूल प्रसादाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये वापरण्यात येणारे सर्व घटक नैसर्गिक आणि आयुर्वेदिकदृष्ट्या औषधीयुक्त आहेत. या तांबूलमध्ये विड्याची पाने, सुपारी, चुना, काथ, लवंग, सोप, वेलची, जायपत्री, जायफळ, धनेडाळ, ओवा, जेष्ठमध, आस्मन तारा या घटकांचा समावेश आहे. पारंपरिक पद्धतीने हे सर्व घटक एकत्र करून दगडी खलबत्त्यामध्ये तांबूल तयार करण्यात येतो. प्राचीन धर्मग्रंथ आणि लोक परंपरेच्या मान्यतेनुसार श्री रेणुका मातेने त्यांचे परम् भक्त असलेल्या श्री विष्णुकवी महाराजांना स्वप्नामध्ये दृष्टांत देऊन तांबुलाचा नवैद्य सुरू करण्याची आज्ञा दिली होती. त्यानंतर ही पवित्र परंपरा आजही अखंडपणे सुरू आहे.



पारंपरिक सेवेकरी कुटुंब कोणत्याही व्यावसायिक फायद्याविना हा वारसा जपण्याचे कार्य करीत आहेत. पूर्वी जवळपास प्रत्येक घरामध्ये जेवणानंतर विड्याचे पान खाण्याची एक समृद्ध भारतीय परंपरा चालत आली होती. अशा कितीतरी समृद्ध परंपरांना आम्ही विसरत चाललो आहोत. या परंपरा तथ्यहीन नाहीत. त्यामध्ये निरोगी जगण्याची कला आणि विज्ञान दडले आहे. आयुर्वेदामध्ये विड्याच्या पानास अमृतासमान मानले गेले आहे. विड्याच्या पानाचे नियमित सेवन केल्यास शरीरामध्ये होणाऱ्या शेकडो रोगांपासून मुक्ती मिळू शकते. त्यामुळे एक शौक म्हणून नव्हे तर मानवी शरीराची एक आवश्यक बाब आणि औषध म्हणून ही परंपरा आमच्या पूर्वजांनी समाजामध्ये रुजविली. ही परंपरा त्यांनी यथाशक्ती जोपासलीही. प्राचीन आयुर्वेद ग्रंथामध्ये सर्व रोगांची वात, पित्त आणि कफ या तीन दोषांमध्ये विभागणी केली आहे. तीन दोषांपैकी शरीरामध्ये एक जरी दोष असंतुलित झाला तर शारीरिक व्याधी उत्पन्न होतात. मानवी शरीरामधील वात आणि कफ असंतुलित झाल्यावर होणाऱ्या आजारांवर विड्याचे पान अतिशय उपयुक्त असल्याचे म्हटले आहे. जेवणानंतर विड्याचे पान खाल्ल्याने मुखामधील अनेक जीवाणूंचा प्रभावीपणे सामना केला जातो. त्यामुळे मुखातील दुर्गंधी नाहीशी होते. दात दुखणे, दात किडणे यावरही विड्याचे पान अतिशय गुणकारी आहे. जेवणानंतर फक्त विड्याचे पान चावून खाल्ल्याने पचनसंस्था सुधारून अपचनाचा त्रास कमी होतो व पोटामध्ये वाढलेला वात (वायू) कमी होण्यास मदत होते. विड्याच्या पानास आयुर्वेदामध्ये उष्ण मानले गेले आहे. त्यामुळे हे पान वात आणि कफ या दोन्ही दोषावर अतिशय उपयुक्त मानले गेले आहे. घशामध्ये कफ साठणे, सर्दी पडसे व आदी कफाच्या अनेक विकारांसाठी पानाचा उपयोग केला जाऊ शकतो. विड्याचे पान उष्ण असल्याने पित्त प्रकृतीच्या लोकांनी जपून वापर करावा, असे आयुर्वेद ग्रंथ सांगतो.

औषधी गुणांनी परिपूर्ण असलेले विड्याचे पान म्हणजे भारतीयांचा एक समृद्ध वारसा आहे. काळाच्या ओघामध्ये आम्ही आधुनिक होत गेल्याने हाही एक समृद्ध वारसा मागे पडला आहे. भारतीय समाजाने आधुनिकतेची कास धरल्याने आम्हीच आमच्या चिरंतन परंपरांना वाळीत टाकले आहे. परंतु, काळानुरूप त्याचे विश्लेषण केल्यास त्यामागे आमच्या पूर्वजांचा वैज्ञानिक दृष्टिकोन सहज लक्षात येईल. जगामध्ये कोठेच नसेल असा भारतीयांचा आहारही एक समृद्ध आणि परिपूर्ण आहार गणला जातो. त्यामुळे या परंपरांना उजाळा देऊन त्याचे जतन केल्यास आमच्या निरोगी आरोग्याचा मार्ग अधिक सुकर होऊ शकतो. ■

९८८१७१७८५६

### इतस्ततः

# आंदोलनातून सुसंवादाचे धडे...

**दत्तात्रेय आंबुलकर**

'नीट' परीक्षेच्या पेपरफुटीच्या निमित्ताने उठलेला गदारोळ, झालेले आंदोलन, या आंदोलनाचे नेतृत्व व त्यातील राजकारण आणि राजकारण्यांचा प्रभाव आणि परिणामकारकता, आंदोलनकर्त्यांची आक्रमकता व सरकारची काही प्रमाणातील हतबलता, निर्णय प्रक्रियेवरच निर्णय घेण्याची आलेली वेळ, आंदोलनातून निर्माण झालेले नवनवे व बदलते मुद्दे आणि या मुद्द्यांवर निर्माण झालेला अथवा निर्माण करण्यात आलेला गतिरोध इ. मुळे परीक्षा पद्धती या मुळात शैक्षणिक स्वरूपातील प्रश्नावर फार मोठ्या प्रमाणावर राजकारण साधण्यात आले. याचदरम्यान आंदोलन आणि आंदोलकांचा आक्रस्ताळेपणा व त्याच वेळी शासन-प्रशासन स्तरावरील विस्कळीत संवाद यांचे जाहीर प्रशासनिक प्रदर्शन झाले. याशिवाय, आंदोलनकाळात अगदी सुरुवातीपासून शासन-प्रशासनाला भावनिक व विचारशीलतेची जोड नसल्यास एखादा महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा मुद्द कसा व कुठवर भरकटू शकतो, याचीही शिकवण या कथित विद्यार्थी आंदोलनातून सर्वच संबंधित समाजघटकांना यानिमित्ताने मिळाली.

या साऱ्या आंदोलक व आंदोलनाची पृष्ठभूमी म्हणजे सर्वोच्च न्यायालयात वारंवार धाव घेऊन प्रसंगी क्षुल्लक मुद्द्यांवर पण सार्वजनिक-लोकहित याचिका दाखल करणाऱ्या आंदोलनकारी याचिकाकर्त्यांवर व त्यांच्या भूमिकेसह उद्दिष्टांवर परखड मत व्यक्त करताना, सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी अशा याचिकांचा उल्लेख 'झुरळ' शब्दात केला. याच शब्दाचा अतिरेकी दुरुपयोग करून आपल्या व आपल्यासारख्या समविचारी व्यक्तींना देशपातळीवरच नव्हे, तर जागतिक स्तरावर भडकावणाऱ्या भावनिक स्तरावर एकत्र करून त्याला सुरुवातीला 'नीट' पेपरफुटीच्या नावाखाली तथाकथित विद्यार्थी आंदोलनाचे व त्यानंतरच्या काळात अल्पावधीत व पद्धतशीरपणे राजकीय नियोजनबद्ध स्वरूप देण्यात आले.

शासन-प्रशासन पद्धतीत व विशेषतः महत्त्वाच्या पदावरून संवेदनशील व समाजजीवनाच्या संदर्भात महत्त्वाचे प्रशासनिक विषय हाताळताना अशा व्यक्तीने कुठलीही व्यक्ती अथवा विषयावर आपले मत विशेषतः जाहीरपणे व्यक्त करताना साधकबाधक तारतम्य बाळगून जाहीर टिप्पणी वा मतप्रदर्शन करणे अत्यावश्यक ठरते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, अधिकार व जबाबदारीच्या पदावर काम करणाऱ्या अशा व्यक्तीच्या मतप्रदर्शनाचा समाजमनावर व प्रसंगी समाजविघातक प्रवृत्तींवर अतिरेकी परिणाम होऊ शकतो.

सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी म्हणजेच, देशाच्या न्यायसंस्थेच्या सर्वोच्च पदावर काम करणाऱ्या सन्माननीय व्यक्तीने विशिष्ट याचिकाकर्त्यांचा उल्लेख 'झुरळ' म्हणून करण्याने जंतरमंतरवरील आंदोलनाला सुरुवात झाली. आंदोलन ऐनभरावर आले असताना आंदोलनाशी संबंधित अन्य याचिकांवर मतप्रदर्शन करताना 'आम्हाला असे व्हिडीओ पाहण्यास वेळ नाही' असे फेरमतप्रदर्शन केल्याने आंदोलन आणि आंदोलनाचा भडका उडाला, हा ताजा इतिहास.

मग वर नमूद केलेले मतप्रदर्शन करणे टाळता येण्यासारखे नव्हते काय? या नेमक्याव विशिष्ट टिप्पणींशिवाय सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व पीठासीन न्यायाधीशांना प्रश्न आणि प्रकरण हाताळता आले असते. सर्वोच्च न्यायालय व एकूणच न्यायव्यवस्थेप्रति संपूर्ण आदर व्यक्त करून पण असे वाटणे स्वाभाविक आहे की, या साऱ्या प्रकाराची 'झुरळ' अशी संभावना न करता, अन्य समर्पक शब्दात वा प्रसंगी अनुल्लेखाने आणि प्रभावीपणे संभावना करता आली असती. व्यवस्थापकीय संदर्भात म्हणूनच भावनिक संतुलनावर आधारित संवाद व संवाद प्रक्रियेला फार महत्त्वाचे मानले जाते. व्यावसायिक-व्यावहारिक संवादप्रसंगी आपला मुद्दा महत्त्वाचा व योग्य असला, तरी त्याची मांडणी-बोलणीदेखील तितकीच संयमितपणे करणे व त्याला संवेदनशीलतेची जोड देणे नितांत आवश्यक असते. असे न झाल्यास संवादातून समस्येवर तोडगा न निघता आंदोलनाचा भडका उडून स्थिती हाताबाहेर जाऊ शकते व तोडगा निघणे जवळजवळ अशक्य होते.

अशाच स्वरूपाची भूमिका विद्यार्थी-आंदोलकांशी संवाद साधताना केंद्र सरकारने केलेल्या विलंबातून दिसून आली. सरकारने आंदोलकांशी संवाद साधण्यासाठी तीन आठवड्यांहून अधिक काळ लावला व तोपर्यंत सुरुवातीला परीक्षा पेपरफुटीच्या माध्यमातून विद्यार्थी आंदोलन म्हणून सुरू करण्यात आलेल्या या आंदोलनावर राजकारणी, पुढारी व सरकार विरोधकच नव्हे; तर समाजकंटक व विध्वंसकारी घटकांनी पुरतेपणी ताबा मिळविला व त्यातून अनेक विपरीत घटना घडून गेल्या. याच राजकारणाची अपरिहार्य परिणती म्हणजे, आंदोलन अधिक हिंसक व अधिकाधिक बेकायदेशीर होत गेले. यातून पोलिसांवर हिंसक हल्ले, आंदोलकांवर लाठीमार, आंदोलनाला चिथावणी देणाऱ्यांना ताब्यात घेणे, अश्रुधुराच्या नळकांड्याचा वापर इ. घटना घडत गेल्या. त्याशिवाय, पंतप्रधान निवासस्थानापर्यंत घडवून आक्रमक आंदोलन करण्याचा अभूतपूर्व प्रकार याचाच पुढील टप्पा ठरला.

अशाप्रकारे 'नीट' पेपरफुटीपासून सुरू झालेल्या असंतोषाने आंदोलनाचे व शासकीय-राजकीय निर्णयांचे अनेक टप्पे अनुभवले. यामध्ये पेपरफुटीनंतर तातडीने व निर्धारित पद्धतीने फेरपरीक्षा घेणारे केंद्र सरकार, त्याला प्रतिसाद देणारे बहुतांश परीक्षार्थी-विद्यार्थी, या साऱ्या प्रक्रियेवर टीका करणारे विरोधी पक्ष, विद्यार्थ्यांना घेरून आंदोलनाच्या माध्यमातून राजकीय खेळी करणारे पुढारी, न्यायालयीन प्रक्रियेशी संबंधित घटक इ. साऱ्यांचा समावेश होता. अपवाद होता तो 'नीट' परीक्षा देणारे विद्यार्थी, त्यांचे पालक आणि परीक्षा प्रक्रियेशी संबंधित महत्त्वाच्या घटकांचा!

विशेषतः विद्यार्थी-आंदोलकांकडून 'नीट' पेपरफुटीच्या प्रकरणातून आलेले नैराश्य, मानसिक धक्का व फेरपरीक्षेची काळजी आणि तणावातून २१ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा दावा करण्याच्या पृष्ठभूमीवर विद्यार्थी-पालकांचा या साऱ्या आंदोलनादरम्यानचा नगण्य सहभाग काही वेगळेच सांगून जातो. इंजिनीअरिंग प्रवेश पात्रता परीक्षेची पूर्वतयारी करणाऱ्यांसाठी मार्गदर्शन करणारे महत्त्वाचे केंद्र व शहर ठरणाऱ्या कोटा शहरात काही विद्यार्थ्यांनी इंजिनीअरिंगमध्ये प्रवेश न मिळण्याच्या धास्तीतून आत्महत्या केल्याप्रकरणी विविध ठिकाणी विद्यार्थी-पालकांनी आंदोलने केली होती व त्यामुळे त्या समस्येची भीषणता पण सर्वांपुढे आली होती.

यावेळी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला लाभलेले राजकीय वळण व असामाजिक तत्त्वांचे पाठबळ या साऱ्यांवर धोरणात्मक स्वरूपात व कायमस्वरूपी उपाययोजना साधण्यासाठी केंद्र सरकारने 'आधार'सारख्या व्यापक व यशस्वी योजनेची अंमलबजावणी करणारे नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखाली नेमलेली तज्ज्ञ समिती व त्याच्याच जोडीला संसदेत तातडीने मांडलेल्या पेपरफुटीप्रकरणी कठोर शिक्षेसह दंडात्मक तरतुदीची केलेली घोषणा आशादायी ठरणारी आहे. ■

(लेखक एचआर आणि व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### वाचक पत्रे

## पक्ष कार्यकर्त्यांचा असावा

कोणत्याही राजकीय पक्षाची खरी ताकद त्याच्या मोठ्या नेत्यांमध्ये नसते, तर तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये असते. कार्यकर्ता हा पक्षाचा पाया असतो. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारा, प्रत्येक संकटात लोकांसोबत उभा राहणारा कार्यकर्ता हा पक्षाचा खरा चेहरा असतो. त्यामुळे नेतृत्वाने कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवून त्यांना संधी देणे ही काळाची गरज आहे. आज अनेक पक्षांमध्ये नेतृत्व काही मोजक्या व्यक्तींपुरते मर्यादित राहिल्याचे चित्र दिसते. परिणामी नवीन नेतृत्व घडण्याची प्रक्रिया मंदावते. कार्यकर्त्यांना जबाबदारी, निर्णयक्षमता आणि नेतृत्वाची संधी मिळाली तर पक्ष अधिक सक्षम, सशक्त आणि जनाभिमुख बनतो. मोठा नेता तोच, जो स्वतःपुरता मर्यादित न राहता अनेक नेते घडवतो.

पक्ष हा केवळ पदाधिकाऱ्यांचा नसून सामान्य कार्यकर्त्यांचा आणि सर्वसामान्य जनतेचा असला पाहिजे. शेतकरी, कामगार, युवक, महिला, विद्यार्थी आणि वंचित घटक यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारा पक्षच समाजात विश्वास निर्माण करू शकतो. कार्यकर्त्याचा सन्मान, त्याच्या मताला महत्त्व आणि त्याच्या कामाची योग्य दखल घेतली गेली तर पक्षसंघटना अधिक बळकट होते. कार्यकर्त्यांना पुढे आणणारे नेतृत्वच भविष्यात पक्षाला दीर्घकाळ टिकवून ठेवते. नेतृत्वाचा खरा वारसा हा पदांचा नसून, सक्षम आणि निष्ठावान कार्यकर्ते घडवण्याचा आहे. वर्तमान राजकारणात प्रत्येक नेत्याने हा विचार स्वीकारण्याची गरज आहे. पक्ष जितका सामान्य माणसाशी जोडलेला असेल, तितकाच तो लोकांच्या मनात आणि लोकशाहीच्या मूल्यांत अधिक दृढपणे रुजलेला राहील.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

■■

## सुजाण नागरिकांचे कर्तव्य... एक चिंतन

लोकशाहीत नागरिकांचे हक्क (अधिकार) आणि कर्तव्य हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे अधिकारांचा उपभोग घेताना प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या जबाबदाऱ्या (कर्तव्य) पार पाडणे हे पण तितकेच महत्त्वाचे आहे. कारण देशाच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी हे अत्यंत आवश्यक आहे. तसेच अधिकारांचा वापर सुयोग्य पद्धतीने व्हावा जेणे करून समाजातील शांतता कायम टिकून राहील. याकरिता संविधानाने नागरिकांना अधिकारासोबत काही मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत आणि याचा विसर पडता कामा नये. सध्याच्या युगात देशाचे रक्षण करणे, शांतता अबाधित ठेवणे हे सुद्ध प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपण जर शिक्षित आहोत तर सुशिक्षित असणे पण तेवढेच गरजेचे नाही का?

शत्रू म्हणजे केवळ सीमेपलीकडे उभा असलेला सैनिक नव्हे. कधीकधी तो देशाच्या सीमेच्या आतही सक्रिय असतो. तो नेहमीच शस्त्रसज्ज होऊन येतो असे नाही; कधीकधी तो भ्रष्टाचार, राष्ट्रविरोधी हिंसाचार, दहशतवाद, संघटित गुन्हेगारी, हेरगिरी, समाजात द्वेष पसरवणे, खोटा प्रचार किंवा राष्ट्रीय ऐक्य धोक्यात आणणाऱ्या कारवायांच्या रूपात प्रकट होतो.

सीमेवर उभा असलेला सैनिक राष्ट्राचे बाह्य आक्रमणापासून रक्षण करतो, परंतु देशात राहणाऱ्या प्रत्येक सजग नागरिकाचे हे कर्तव्य आहे की, त्याने कायद्याचा आदर करावा, समाजात सलोखा राखावा, सत्य आणि सदसद्विवेकबुद्धीला पाठिंबा द्यावा आणि राष्ट्राची सुरक्षा, ऐक्य व अखंडता धोक्यात आणणाऱ्या कोणत्याही कृतीला विरोध करावा. सैनिक सीमेचे रक्षण करतात, पण सजग नागरिक राष्ट्राच्या आत्म्याचे रक्षण करतात. म्हणून, सध्याच्या काळात सुजाण नागरिकांचे कर्तव्य म्हणजे केवळ कायद्याचे पालन करणे नव्हे, तर लोकशाही मूल्यांचे रक्षण करणे, पर्यावरणाचे जतन करणे, डिजिटल युगात जबाबदारीने वागणे आणि राष्ट्र उभारणीत सक्रिय योगदान देणे होय.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

■■

## शहरातील पुरावर उपाय शोधायला हवा

यंदा पाऊस विलंबाने आला. आला तेव्हा एक दोन तासांच्या पावसाने सगळीकडे नद्या निर्माण झाल्या. शाळेतील मुले पावसाच्या भयावह स्थितीने भयभीत झालीत. दुकाने जलमय झालीत. अनेक घरांत पाणी शिरले आणि गृहिणींची तारांबळ उडाली. घरातील साहित्याची अवस्था दयनीय झाली. नागपूरसह मोठ्या शहरात महापूर आला त्याचे कारण काय असावे. सगळीकडे सिमेंटचे रस्ते झाले, त्याच्या बाजूला सिमेंट ब्लॉक्स लागले आणि याला जोडून पदपथ झाले. आता पाणी जमिनीत मुरण्यासाठी जागाच उरली नाही. पाणी लगेच जायला हवे असेल तर पाण्याचा मार्ग मोकळा हवा. कचरा, प्लास्टिक असेल तर पाण्याचा रस्ता बंद होतो आणि वाहतूक विस्कळीत होते. त्यामुळे अपघाताला आमंत्रण मिळते. विनाकारण जीवहानी, वित्तहानी होते. गेल्या काही वर्षांत जलमय स्थिती निर्माण होते आहे. पाऊस येतो आणि जातो, पण आला की भल्याभल्यांना उद्ध्वस्त करून जातो. सधन लोकांना पुन्हा नव्याने सावरता येते, पण गरीब लोकांचे आयुष्य उद्ध्वस्त होते. घरातील होते नव्हते ते पाण्यात वाहून गेल्याने जगायचे कसे, हा प्रश्न उभा राहतो. यावर उपाय शोधायला हवा. ■

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणीची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ ऑगस्ट : शहरातील विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील विद्यमान क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्या शेजारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, या मागणीसाठी दि. ३ ऑगस्ट रोजी लातूर महानगरपालिका आयुक्त, महापौर, मनपा नगरसेवक यांना सर्व समाजातील महिलांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

या निवेदनावर शहरातील विविध समाजघटकांतील महिला, सामाजिक कार्यकर्त्या, शिक्षिका, विद्यार्थिनी, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच समतावादी नागरिक यांच्या मोठ्या संख्येने स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. निवेदन देण्याच्या वेळी मोठ्या संख्येने महिला व नागरिक उपस्थित होते. त्यामुळे या मागणीला व्यापक लोकसमर्थन लाभल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या निवेदनावर आशा सुशील चिकटे, शोभाताई सोनकांबळे, सुजाता आजनिकर, निर्मला थोटे, शशिकला सुरवसे, निर्मला गौरकर, सरिता बनसोडे, मयुरी आल्टे, प्रणिता वाघमारे, मंगल कांबळे, कविता कदम, प्रतिभा कांबळे, शामल कांबळे, ललिता गायकवाड, प्रेमीला आपटे, शकुंतला नेत्रागावकर, बेबी कांबळे, मीना कदम, सुशील चिकटे, उदय सोनवणे, पांडुरंग अंबुलगेकर, मुकुंद वाघमारे, प्रा. विश्र्वनाथ आल्टे, ज्योतीराम लामतुरे, मिलिंद धावारे आदींसह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## विविध वृत्त.....

### जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता सहावी प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी सुरू

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ४ ऑगस्ट : जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता सहावी प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाइन नोंदणी सुरू झाली असून ही परीक्षा २८ नोव्हेंबर २०२६ रोजी होणार आहे.

लातूर जिल्ह्यातील २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवीत शिक्षण घेत असलेले विद्यार्थी या प्रवेश परीक्षेसाठी पात्र आहेत. उमेदवाराची जन्मतारीख १ मे २०१५ ते ३१ जुलै २०१७ या कालावधीत असणे आवश्यक आहे.

इयत्ता सहावी प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी HTTPS://CBSEITMS.RCIL.GOV.IN/NVS/ या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरावा, असे आवाहन लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य यांनी केले आहे.

### सीआरपीएफ रंगरूट प्रशिक्षण केंद्रात २ हजार रोपांचे वृक्षारोपण

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.४ ऑगस्ट : येथील केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) रंगरूट प्रशिक्षण केंद्रात पोलीस उपमहानिरीक्षक तथा प्राचार्य अमीरुल हसन अंसारी यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमाअंतर्गत सुमारे २ हजार रोपांची लागवड करण्यात आली.

लागवड करण्यात आलेल्या रोपांमध्ये स्थानिक प्रजातींची फळझाडे, सावली देणारी वृक्ष तसेच औषधी वनस्पतींचा समावेश होता.

यावेळी उपस्थित अधिकारी आणि जवान प्रशिक्षार्थींना मार्गदर्शन करताना अमीरुल हसन अंसारी म्हणाले, आपण केवळ राष्ट्राच्या सुरक्षेसाठीच नव्हे, तर पर्यावरणाच्या संरक्षणासाठीही कटिबद्ध आहोत. आज लावलेली झाडे भविष्यातील पिढ्यांसाठी अमूल्य ठेवा ठरतील.

या कार्यक्रमाला कमांडंट पारसनाथ, राजपत्रित अधिकारी, जवान तसेच सुमारे १ हजार ७०० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करण्याची शपथ घेतली.

यापूर्वीही सीआरपीएफ आरटीसी, लातूरतर्फे कॅम्प परिसर आणि आजूबाजूच्या भागात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले आहे. त्यामुळे हा परिसर विविध पक्षी व वन्यजीवांसाठी सुरक्षित अधिवास म्हणून विकसित होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### मत्स्यपालकांसाठी आधुनिक तंत्रज्ञानावरील प्रशिक्षण उत्साहात

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.४ ऑगस्ट : मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मत्स्यपालकांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार, कौशल्य विकास आणि जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशानेआधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक जाळी व बोटी आणि मत्स्य हाताळणी व विपणनया विषयावरील एकदिवसीय जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाराष्ट्र शासनाचे मत्स्यव्यवसाय आयुक्त यांच्या निर्देशानुसार सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, लातूर तथा दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्राणिशास्त्र व मत्स्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे पदाधिकारी, पीएमएमएसवाय प्रकल्पधारक मत्स्यशेतकरी आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे होते. प्राणीशास्त्र व मत्स्य विभागाचे विभागप्रमुख डॉ. रवी सोळुंके, शासनाच्या मत्स्यव्यवसायविभागाच्यासहाय्यक आयुक्त तेजस्विनी करळे यांनी आधुनिक मत्स्यव्यवसायातील संधी, शाश्र्वत उत्पादन, कौशल्य विकास आदींसह शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. मत्स्यपालन, उत्पादनवाढ, खर्च नियंत्रण आणि उद्योजकतेच्या संधी याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.

## शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी तडजोड नाही नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ४ ऑगस्ट : शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत लातूर जिल्हा पोलीस दलाने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहे. एका प्रवासी ऑटो मध्ये वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन करीत ऑटो चालकाने त्याच्या ऑटो मध्ये क्षमतेपेक्षा अधिक १३ लहान विद्यार्थ्यांची वाहतूक करून त्यांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या संबंधित वाहनचालकावर वाहतूक शाखेमार्फत मोटार वाहन कायनुसार कारवाई करण्यात आली आहे.

लातूर पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक, निष्काळजी वाहनचालक, आवश्यक सुरक्षा उपायांचा अभाव किंवा वाहतूक नियमांचे उल्लंघन यामुळे विद्यार्थ्यांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात विशेष तपासणी मोहीम सुरू असून नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जात आहे. याप्रसंगी सर्व शाळा व्यवस्थापन, शालेय बस व ऑटो-रिक्षा चालक, वाहनधारक तसेच पालकांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोणत्याही वाहनातून क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक होणार नाही, याची जबाबदारी संबंधित संस्था, चालक आणि पालकांनीही घ्यावी.

शहराच्या विविध भागातून अशाप्रकारे शालेय विद्यार्थ्यांची नियमित वाहतूक वर्षानुवर्षे केली जात आहे. अक्षरशः मेंढरांप्रमाणे विद्यार्थी ऑटोमध्ये कोंबून भरधाव वेगात नेले - आणले जातात. पालकांना आपण आपल्या पाल्यासाठी ऑटो लावलाय, म्हणजे तो सुरक्षित शाळेत जाईल आणि घरी परत येईल असे वाटत असते. परंतु संबंधित ऑटोचालक आपल्या ऑटोमध्ये किती विद्यार्थी बसवून नेतोय, त्याच्याकडे विद्यार्थी वाहतुकीसाठी आवश्यक असणारा परवाना आहे का ?, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या सुविधा संबंधित ऑटोमध्ये उपलब्ध आहेत का ? अशा अनेक बाबींची सूक्ष्म चौकशी पालकांनीही करणे आवश्यक आहे. पाल्याला शाळेसाठी ऑटो लावलाय एवढ्या गोष्टींवर पालकांनी स्वस्थ बसता कामा नये,असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

एकाच ऑटोमध्ये किती विद्यार्थी बसवून नेले पाहिजेत, यावरही यापुढे पोलीस प्रशासनाच्या अनुमतीने निर्बंध लादणे आवश्यक बनले आहे. यापुढे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी खेळ करणारी कोणतीही घटना आढळून आल्यास संबंधित चालक, वाहनधारक, शाळा व्यवस्थापन तसेच आवश्यकतेनुसार संबंधित पालकांविरुद्धही प्रचलित कायद्यानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा लातूर जिल्हा पोलीस दलाने दिला आहे.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागातहीअशीच अवस्थाविद्यार्थ्यांची वाहतूक करणारे ऑटो केवळ शहरी भागातच कोंबून विद्यार्थी नेतात असे नाही, तर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही हा प्रकार मागच्या अनेक वर्षांपासून सर्रास सुरु आहे. आजघडीला इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पेव मोठ्या प्रमाणात फुटले आहे. पालकहीआपल्या पाल्यालामराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश देण्याऐवजी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश देण्यास उत्सुक असल्याचे दिसून येते. अगदी प्री प्रायमरी स्कुलचेप्रमाण सुद्धा सगळीकडेच वाढलेले पाहायला मिळते. परंतु या सगळ्या प्रकारात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे मात्र सर्वांचे सपशेल दुर्लक्ष होत असलेले पाहावयासमिळते.शिक्षण मानवी जीवनातील एक अविभाज्य घटक आहे. लहानपणापासूनचशिक्षणाचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न पालक करत असतात. त्यासाठीचहा सगळा आटापिटा चालू असतो. परंतु शिक्षण देण्यासोबतचपाल्याच्यासुरक्षिततेतलाह ीसंबंधित शाळांचे संचालक आणि पालकांनी प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. कामाच्या धबडग्यामुळे प्रत्येक पालक आपल्या पाल्याला शाळेत नेऊन सोडू आणि शाळा सुटल्यावर घरी परत आणू शकत नाही. त्यासाठीचस्कुल बस, ऑटोरिक्षा आदी पर्यायांचा उपयोग मागच्या अनेक वर्षांपासून केला जात आहे. विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनासाठी सुरक्षिततेचे अनेक नियम बंधनकारक करण्यात आले आहेत. परंतु बहुसंख्य ठिकाणी या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात नाही. त्यातूनचएखादी दुर्घटना घडल्यास निष्पाप बालकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शहरी भागाप्रमाणेच सुरक्षिततेचे निकष ग्रामीण भागातही लागू होणे आवश्यक असल्याच्याप्रतिक्रिया पालकातून व्यक्त होत आहेत.

## शहरातील भुयारी गटार कामाची महापौरांकडून पाहणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ ऑगस्ट : शहरात भुयारी गटार योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. सोमवार दि. ३ जुलै रोजी महापौर जयश्रीताई सोनकांबळे यांनी सहकाऱ्यांसह या कामाची पाहणी केली. भुयारी गटारीच्या कामासाठी खोदलेल्या रस्त्यांचे पॅचवर्क तातडीने करण्याच्या सूचना त्यांनी कंत्राटदारास दिल्या.

शहराच्या विविध भागात भुयारी गटार योजनेची कामे सुरू आहेत. त्यासाठी रस्ते खोदण्यात येत आहेत.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने अनेक ठिकाणी चिखल होणे, रस्ते खराब होणे अशा तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. त्या अनुषंगाने महापौर जयश्रीताई सोनकांबळे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे, सदस्य शिवाजी जवळगेकर, युनुस मोमीन, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता शिवसागर मंठाळे यांच्यासह शहराच्या विविध भागात पाहणी केली. कंत्राटदारही यावेळी उपस्थित होते.

सध्या सुरू असलेल्या भुयारी गटार योजनेची कामे जलद गतीने पूर्ण करावी. कामांसाठी ज्या ठिकाणी रस्ते खोदण्यात आले आहेत त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशा सूचना त्यांनी संबंधित कंत्राटदाराला केल्या.

## बोगस बियाणांच्या विरोधात शेतकरी नेते रघुनाथ पाटील आक्रमक



तभा वृत्तसेवा

लातूर : यंदाच्या मान्सूनने शेतकऱ्यांना म्हणावी अशी साथ दिली नाही. त्यामुळे शेतकरी अडचणीत आला. जुनमध्ये पडलेल्या तुरळक पावसावरच शेतकऱ्यांनी हिमतीने पेरण्या केल्या होत्या. पाऊसच गायब झाल्याने दुबारपेरणीचे संकट समोर उभे होते. जुलैअखेर पडलेल्या पावसाने पिकांना जीवदान दिले. तर दुसरीकडे बोगस बियाणांमुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे दि. ३ ऑगस्ट रोजी शेतकरी नेते रघूनाथ पाटील यांनी लातूरला येऊन बोगस बियाणांच्या विरोधात कृषि अधीक्षक कार्यालयात ठिय्या आंदोलन केले.

लातूर जिल्ह्यात यावर्षी आधीच पाऊस उशिराने पडला आणि त्यातच शेतकऱ्यांनी पेरलेले बियाणे उगवलेच नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत. मात्र कृषि विभाग यावर कीच कारवाई करत नसल्याने शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथ पाटील यांनी थेट कृषि अधीक्षक कार्यालयातच ठिय्या मांडत जिल्हा कृषि अधीक्षकांना जाब विचारला. तसेच बोगस बियाणे व खते निर्माण करणाऱ्या कंपन्यावर कारवाई करण्यात यावी यासाठी कृषि मंत्री आणि मुख्यमंत्री यांच्याकडेदेखील जाणार असल्याचे सांगीतले. सध्याचे सरकार हे 'ढ' विद्यार्थ्यांचे सरकार असून नापास सरकार असल्याची जळजळीत टीकादेखील शेतकरी नेते रघुनाथ पाटील यांनी यावेळी केली.

राज्यभरात ज्या कांही शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत आणि शेतकऱ्यांना जी कर्जमाफी सरकारने दिली ती कर्जमाफी नको तर कर्जमुक्ती हवी आहे. यासाठी दरवर्षी राज्यभरातील शेतकरी ९ ऑगस्ट रोजी एकत्र येतात त्याच प्रमाणे यावर्षीदेखील राज्यभरातील शेतकरी हे ९ ऑगस्ट रोजी नांदेड जिल्ह्यात एकत्र येणार आहेत आणि आंदोलनाची पुढील दिशा ठरवणार असल्याची माहिती शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथ पाटील यांनी एका पत्रकार परिषदेत दिली आहे.

## आंतरराष्ट्रीय न्याय दिन आणि जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती
### जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या जनजागृती कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा



लातूर, दि. ४ ऑगस्ट : आंतरराष्ट्रीय न्याय दिन आणि जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय आणि जिल्हा वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा, १९९४ विषयक जनजागृती कार्यक्रम पार पडला.

जिल्हा वकील संघाच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, जिल्हा सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. आर. निळेकर, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या विधी सल्लागार श्रीमती ए. आर. मेकले, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड. शिवकुमार जाधव आणि ड. स्नेहा शिणगारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

भारतात स्त्रीला माता आणि शक्तीस्वरूप मानले जात असताना स्त्रीभ्रूणहत्येसारख्या घटना घडणे ही दुर्दैवी बाब आहे. स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे ही काळाची गरज असल्याचे विधी सेवा प्राधिकरणचे सचिव श्री. गिरवलकर यांनी यावेळी नमूद केले.

श्रीमती ए. आर. निळेकर आणि श्रीमती ए. आर. मेकले यांनी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्यातील तरतुदी, नियम, तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया, पंचनामा करण्याची पद्धत तसेच कायद्याच्या अंमलबजावणीतील महत्त्वाच्या बाबी याविषयी सविस्तर माहिती दिली.

ड. शिवकुमार जाधव यांनी गर्भलिंग निवड प्रतिबंध कायदा, आंतरराष्ट्रीय न्याय दिन आणि वाढत्या लोकसंख्येच्या आव्हानांबाबत समाजात व्यापक जनजागृती होण्याची आवश्यकता अधोरेखित केली. ड. स्नेहा शिणगारे यांनी आंतरराष्ट्रीय न्याय दिनाचे महत्त्व, सर्वसमावेशक न्यायव्यवस्थेची भूमिका तसेच आरोग्य, लोकसंख्या नियंत्रण आणि त्याचे सामाजिक परिणाम यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे उपमुख्य न्यायरक्षक ड. जी. जे. मिटकरी यांनी केले, तर आभार ड. मंजुश्री शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष ड. लहूजी चामे, सचिव ड. गुरुप्रसाद येरटे, सहसचिव ड. सिद्धेश्र्वर धायगुडे, कोषाध्यक्ष ड. नितीन राठोड यांच्यासह विधीज्ञ, अधिकार मित्र आणि पक्षकार उपस्थित होते.

## 'एक क्लिक चुकले तर मोठे नुकसान'
### यशवंत विद्यालयात सायबर सुरक्षेची जनजागृती

तभा वृत्तसेवा




लातूर दि. ४ ऑगस्ट : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत यशवंत विद्यालय, नांदेड रोड, लातूर येथे इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले. डिजिटल युगात वाढत असलेल्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्र्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या सत्रात सायबर वॉरिअर नरेश पंडित व सायबर वॉरिअर अविष्कार कांबळे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले. विशेषतः ऑनलाइन गेम्सचे वाढते व्यसन, गेमिंगच्या माध्यमातून होणारी आर्थिक फसवणूक, अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संवादाचे धोके तसेच गेमच्या नावाखाली मागितली जाणारी वैयक्तिक माहिती शेअर केल्यामुळे उद्भवणारे धोके याबाबत विद्यार्थ्यांना सावध करण्यात आले.

याशिवाय संशयास्पद लिंकवर क्लिक केल्यास होणारे नुकसान, फिशिंग लिंक कशा ओळखाव्यात, मोबाईलमध्ये येणारे बनावट मेसेज व कॉलपासून कसे सावध राहावे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, मजबूत पासवर्ड तयार करण्याची योग्य पद्धत आणि वैयक्तिक माहितीची गोपनीयता जपण्याचे महत्त्व याबाबतही विद्यार्थ्यांना उदाहरणांसह मार्गदर्शन करण्यात आले. ऑनलाइन फसवणुकीचा बळी ठरल्यास तात्काळ राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधून तक्रार नोंदविण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहण्याची तयारी दर्शवत सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी डी. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पांचाळ मॅडम यांनी विशेष सहकार्य केले. तसेच विद्यालयातील शिक्षकवृंदाची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.

## संक्षिप्त...

### प्रा. डॉ. संजय शिंदे लिखित पुस्तकाचा विद्यापीठ अभ्यासक्रमात समावेश



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ ऑगस्ट : येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजय निवृत्तीराव शिंदे लिखित फंडामेंटल ऑफ एंटोमोलॉजी या पुस्तकाचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे विज्ञान तंत्रज्ञान शाखा अंतर्गत नवीन शैक्षणिक धोरणानुसार बीएससी तृतीय वर्षासाठी करण्यात आला आहे.या पुस्तकाचा समावेश झाला असल्याचे विद्यापीठांनी त्यांना नुकतेच कळवले आहे .या बद्दल संस्थेचे अध्यक्ष उमेश पाटील देवणीकर ,सचिव सौ डॉ मनीषाताई वाडियार, प्रभारी प्राचार्य डॉ एन जी येमेकर,तसेच संस्थेचे सर्व सदस्य प्राध्यापक, शिक्षकेतर यांनी अभिनंदन केले आहे.

### कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर यांची पुण्यतिथी साजरी

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ ऑगस्ट : छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामकिशन मांजरे यांनी बापूसाहेब पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ते आपल्या मनोगतात असे म्हणाले की, बापूसाहेब पाटील यांनी महाराष्ट्र व कर्नाटक या सीमा भागात उदगीर येथे किसान बोर्डिंगची स्थापना करून शिक्षणाचे रोपटे लावले. आपल्या निवडक सहकाऱ्यांना घेऊन किसान शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. आज या संस्थेच्या २२ शाखा स्थापन आहेत. रयत शिक्षण संस्थेच्या धर्तीवर आधारित गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी हा मुख्य विचार या पाठीमागे होता असे याप्रसंगी ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जयंती समिती प्रमुख तथा मराठी विभागप्रमुख डॉ. सुरेश शिंदे यांनी केले. तर आभारप्रदर्शन सहसंयोजक डॉ. ज्ञानोबा मुळे यांनी केले

## लायन्स क्लब उदगीरच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

# सक्षम व्यक्ती - सक्षम परिवार ही काळाची गरज : कुमुदिनी भार्गव

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ ऑगस्ट : लायन्स क्लब इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ क-२, रिजन ७, झोन ३ अंतर्गत लायन्स क्लब उदगीरच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा अशोक मेहता सभागृह, उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्ररुग्णालय, उदगीर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन अध्यक्षा लॉ. डॉ. स्मिता लखोटिया होत्या. लॉ. सौ. सुप्रिया कोतवाळ, उपप्रांतपाल-२, प्रांत ३२३४ क-२ यांनी पदग्रहण अधिकारी म्हणून नूतन कार्यकारिणीला पद व गोपनीयतेची शपथ दिली.

प्रमुख मार्गदर्शक भारतीय स्त्री शक्तीच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती कुमुदिनी भार्गव यांनी सक्षम व्यक्ती - सक्षम परिवार या विषयावर प्रभावी मार्गदर्शन करताना, सक्षम व्यक्ती आणि सक्षम परिवार ही काळाची गरज असून प्रत्येकाने आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत विविध क्षेत्रात कार्य करताना सर्वप्रथम स्वतः मध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे, स्वतः ला सक्षम बनविणे आणि आनंदी जीवन जगण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले.

नूतन अध्यक्षा लॉ. डॉ. स्मिता लखोटिया यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात समाजसेवेची दिशा स्पष्ट करत चार महत्त्वाच्या मुद्द्यांवर भर दिला. प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर हसू फुलविणे, माणुसकी जपणे, निःस्वार्थ सेवाभावातून समाजाची सेवा करणे आणि सकारात्मक समाजबदलासाठी प्रत्येकाने योगदान देणे ही लायन्स चळवळीची मूलभूत उद्दिष्टे असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक सदस्याने सेवा कार्यातून समाजात आनंद, विश्र्वास आणि परिवर्तन घडवून आणण्यासाठी कटिबद्ध राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका, नगरपालिका महिला कर्मचारी, महिला ऑटोचालक तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सक्षम महिलांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. तसेच सेल्फी पॉईंटचे उद्घाटनही करण्यात आले.

सन २०२६-२७ या वर्षासाठी लॉ. डॉ. स्मिता लखोटिया यांनी अध्यक्ष, लॉ. सौ. रामकन्या बाहेती यांनी सचिव तर लॉ. सौ. तृप्ती मुंदडा यांनी कोषाध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला.

कार्यक्रमास नगराध्यक्षा सौ. स्वाती सचिन हुडे, डॉ. रामप्रसाद लखोटिया, रिजन चेअरमन डॉ. अजय नारायणकर, लॉ.प्रा.महेश बसपुरे,लॉ. ॲड. बालाजी आडेप्पा, लॉ. दीपक जोशी, लॉ. प्रा. बालाजी सोलापूरे तसेच लायन्स परिवारातील सदस्य आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एसआयआर . मोहिमेत जळकोट तालुका राज्यात प्रथम

### मतदार यादीत पुनरिक्षणाचे शंभर टक्के काम पूर्ण

तभा वृत्तसेवा

जळकोट दि. ४ ऑगस्ट : मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मतदारांची घराघरांत जाऊन पडताळणी, नावांतील दुरुस्ती, मतदार यादी अद्ययावतीकरण, संगणकीकरण आणि डिजिटायझेशनची शंभर टक्के पूर्तता करत जळकोट तालुक्याने हा मान मिळविला.

एसआयआर मोहिमेचा प्रारंभ २९ जून २०२६ रोजी झाला असून ८ ऑगस्टपर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे. मात्र, शासनाने दिलेल्या मुदतीपूर्वीच जळकोट तालुक्याने पहिल्या टप्प्यातील सर्व काम पूर्ण केले. ताल तालुक्यातील अधिकारी, कर्मचारी आणि बीएलओ यांनी सुट्टया व सणवार बाजूला ठेवून रात्रंदिवस परिश्रम घेतल्याने हे यश मिळाल्याचे सांगण्यात आले.

तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी राजेश लांडगे यांनी सुरुवातीपासूनच जळकोट तालुक्याने राज्यात अव्वल यावे, हे उद्दिष्ट ठेवून सातत्याने बैठका घेतल्या. गावोगावी भेटी, शिक्षकांशी संवाद, बीएलओंच्या कामाचा(६) यूएस

दैनंदिन आढावा आणि रोजच्या प्रगतीचे नियोजन यामुळे कामाला गती मिळाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जळकोट तालुक्याने केवळ जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळविला. तालुक्यातील एकूण ७३ हजार ४८१ मतदारांचे शंभर टक्के डिजिटायझेशन आणि मॅपिंग पूर्ण करण्यात आले. या कामात आशा सेविका, अंगणवाडी. सेविका व मदतनीस यांनी कोणत्याही अतिरिक्त मानधनाची अपेक्षा न ठेवता मोलाचे सहकार्य केले.

## आदिशक्ती अभियानात जळकोट तालुक्यात ग्रा.पं. वांजरवाडा प्रथम

तभा वृत्तसेवा

जळकोट दि. ४ ऑगस्ट : महिला व बाल विकास विभागामार्फत राज्यभर राबविण्यात आलेल्या आदिशक्ती अभियान २०२५-२६ अंतर्गत जळकोट तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या गौरव करण्यात आला असून, वांजरवाडा ग्रामपंचायतीने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे तर डोंगरकोनाळी ग्रामपंचायतीने द्वितीय आणि सोनकळा ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक मिळविला आहे

राज्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्यांची जाण ठेवून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत सन २०२५-२६ पासून आदिशक्ती अभियान राबविण्यात येत आहे. दि. २२ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार हे अभियान सुरू करण्यात आले असून दि. १ जुलै २०२५ रोजी त्यामध्ये अंशतः सुधारणा करण्यात आल्या आहेत. अभियान प्रभावीपणे राबविणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर 'आदिशक्ती पुरस्कार' देऊन गौरविण्याची तरतूद करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत वांजरवाडा ग्रामपंचायतीने विविध महिला सक्षमीकरण उपक्रम प्रभावीपणे राबवून तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

# १० कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा महाअभियानाची उद्या ६ ऑगस्ट पासून सुरुवात

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ ऑगस्ट:समाजसेवा आणि राष्ट्रउभारणीसाठी समर्पित असलेल्या दादी प्रकाशमणीजींच्या पवित्र स्मृतीस ही मोहीम एक विनम्र आदरांजली आहेब्रह्मकुमारी ही एक आंतरराष्ट्रीय आध्यात्मिक आणि सामाजिक संस्था आहे, जी ११० हून अधिक देशांमध्ये मूल्य-आधारित शिक्षण, राजयोग ध्यान, व्यक्तिमत्व विकास, सकारात्मक विचार आणि व्यसनमुक्ती पोहोचवते. व्यक्तींना आत्मनिर्भर बनवून त्यांच्यात सकारात्मक बदल घडवणे आणि एक शांततापूर्ण, निरोगी व सक्षम समाज निर्माण करणे हे या संस्थेचे ध्येय आहे.




भारतभरातील आपल्या ५,५०० हून अधिक सेवा केंद्रांच्या माध्यमातून, लाखो लोक नियमितपणे राजयोग ध्यान, आध्यात्मिक शिक्षण आणि जीवन व्यवस्थापनाचा लाभ घेतात. ब्रह्मकुमारी संस्था युवा सक्षमीकरण, महिला सक्षमीकरण, कौटुंबिक मूल्ये, आरोग्य जागरूकता, तणावमुक्त जीवनशैली आणि सामाजिक सलोखा यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उपक्रम राबवते.

दादी प्रकाशमणी जी - एक संक्षिप्त परिचय दादी प्रकाशमणी जी या ब्रह्मकुमारींच्या माजी मुख्य प्रशासक आणि एक जगप्रसिद्ध आध्यात्मिक मार्गदर्शक होत्या. आपल्या साध्या व्यक्तिमत्त्वाने, प्रेमळ दयाळूपणाने आणि प्रेरणादायी नेतृत्वाने त्यांनी लाखो लोकांमध्ये शांती, सकारात्मकता आणि आध्यात्मिक जागृती आणली.

प्रेम, करुणा, सेवा आणि नैतिक मूल्यांवर आधारित जीवनशैलीचा प्रचार करत, त्यांनी जगभरात मानव कल्याण, महिला सक्षमीकरण, सामाजिक सलोखा आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या नेतृत्वाखाली, ब्रह्मकुमारींनी आपल्या सेवा कार्याचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तार केला.

खरी सेवा तीच आहे जी मानवी जीवनात आशा, सामर्थ्य आणि बदल घडवून आणते.- राजयोगिनी दादी प्रकाशमणी जी राष्ट्रीय उपक्रम आणि जन आंदोलन नशा मुक्त भारत अभियान आणि मिशन स्पंदन हे उपक्रम भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या संकल्पना पत्राअंतर्गत सन २०२३ पासून आणि गृह मंत्रालय - अमली पदार्थ नियंत्रण ब्युरो छ्उइख यांच्या सहकार्याने सन २०२५ पासून राबवले जात आहेत. देशभरात अमली पदार्थांच्या गैरवापराविषयी जागरूकता वाढवणे, अमली पदार्थ प्रतिबंध मजबूत करणे आणि युवक व समाजाला सक्षम करणे, हा या मोहिमेचा उद्देश आहे.

लोकांना सकारात्मक आणि निरोगी जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रेरित करणे. व्यसनमुक्त भारत मोहीम अंतर्गत अंमली पदार्थांचे व्यसनमुक्ती प्रतिज्ञा हजारो शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती आणि सामाजिक संस्थांमध्ये प्रवेश या मोहिमेने राष्ट्रीय स्तरावर एका जनआंदोलनाचे स्वरूप धारण केले आहे. उपाय - राजयोग जीवनशैली राजयोगाच्या साधनेमुळे व्यक्तीला मानसिक संतुलन, आत्मनियंत्रण आणि सकारात्मक दृष्टिकोन प्राप्त होतो.

मनाची शांती आणि स्थिरता माणसाला तणाव, चिंता आणि नकारात्मक विचारांमध्ये घट सकारात्मक दृष्टिकोन मत्सर, राग, भीती आणि तणावावर मात करतो. ध्येय सेट जीवन जीवनात दिशा, प्रेरणा आणि समाधान मिळवायला आत्मपरीक्षण आणि स्वतःशी संवाद साधल्याने मानसिक अवलंबित्व कमी होण्यास आणि व्यसन सोडण्यास मदत होते.

मूल्य आधारित जीवन स्वीकारा सत्य, अहिंसा, प्रेम, करुणा, सहकार्य आणि शिस्त सत्संग आणि सकारात्मक संगती चांगले विचार, उत्तम साहित्य आणि चांगल्या संगतीत रमून जाणे होय. ब्रह्माकुमारीज सद्भावना भवन ओम शांती कॉलनी उदगीर स्थानिक राजयोग सेवा केंद्राच्या वतीने दि.६ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०२६ पर्यंत प्रत्येक भ्राता, दीदी, भाईद्वारे तथा व्यक्तीने किमान ५० लोकांना शपथ घ्यायला लावली जाणार आहे. तसेच नशामुक्त समाज उभारण्यासाठी प्रत्येकाने स्वयं स्फूर्ती प्रेरणेतून योगदान द्यावे. तरुणांना सकारात्मक दिशा मिळाली पाहिजे. तसेच कुटुंबांना एकत्र आणायचे आहे आणि सामाजिक बदल घडवून आणायचे आहे.

राजयोग ध्यान स्वतः करा दररोज १०-२० मिनिटे राजयोग ध्यान करून आत्मविश्र्वास आणि शांती मिळवा. असेही स्थानिक राजयोग सेवाकेंद्र ब्रह्माकुमारीज सद्भावना भवन ओम शांती कॉलनी उदगीरच्या संस्थापिका ब्रह्माकुमारी बीके महानंदा दीदी यांनी केले.

# डिजिटल युगात सुरक्षिततेची जाणीव

## जनता विद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ ऑगस्ट : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत जनता विद्यालय, महाळंग्रा, लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

दि. ०३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत हे सत्र पार पडले. यावेळी इयत्ता ९वी ते १०वी मधील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, डिजिटल सुरक्षितता आणि इंटरनेटचा जबाबदारीने वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या सत्रामध्ये सायबर वॉरिअर पायल साबणे व सायबर वॉरिअर पाटील सृष्टी यांनी विद्यार्थ्यांना फोटो मॉर्फिंग म्हणजे काय, कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) च्या माध्यमातून फोटो कसे तयार केले जातात, -ख चा सुरक्षित व जबाबदारीने वापर याबाबत उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मजबूत (डीपस) पासवर्ड कसा तयार करावा, पासवर्ड सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व आणि ऑनलाइन खात्यांचे संरक्षण कसे करावे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

मोबाईलमध्ये कोणतेही प डाउनलोड करताना प कोणत्या परवानग्या (झशीर्ळीीळेपी) मागते, कोणत्या परवानग्या द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याबाबतही विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. त्याचबरोबर ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, फिशिंग, जॉब फसवणूक, जढ्झ व वैयक्तिक माहितीची सुरक्षितता आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले.

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया आणि -ख चा वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थ्यांनी कोणतीही माहिती पडताळणी न करता शेअर करू नये, अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, आपले जढ्झ, पासवर्ड किंवा वैयक्तिक माहिती कोणालाही देऊ नये, तसेच संशयास्पद ऑनलाइन व्यवहारांपासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले.

संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्र्न विचारून सायबर सुरक्षेविषयी आपली उत्सुकता व्यक्त केली. प्रत्यक्ष उदाहरणे आणि दैनंदिन जीवनातील प्रसंगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे समजावून सांगण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक पंडगें सर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी त्यांनी विशेष सहकार्य केले.

# शिरूर अनंतपाळ येथे शेतकरी जनआक्रोश मोर्चा

## तलाठी-मंडळ अधिकाऱ्यांवरील कारवाईसह पाच प्रमुख मागण्या

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ, दि. ४ ऑगस्ट : अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने सोमवारी (दि. ३ ऑगस्ट) शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालयावर शेतकरी जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.



या जन आक्रोश मोर्चाचे स्वरूप एवढे व्यापक होते की या मोर्चाला जन आंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले होते. या आंदोलनामध्ये लहान थोर तरुण या सोबतच मोठ्या प्रमाणावर महिलांचा सुद्धा सहभाग असलेला दिसून आला. या सर्व मोर्चातील लोकांकडून दिलेल्या घोषणामुळे परिसर दुमदुमून गेला होता. आणि प्रत्येकाच्या मुखातून संबंधित दोषी अधिकाऱ्याला शिक्षा द्या. धडा शिकवा असे शब्द त्या अंत्ययात्रे मध्ये निघत असलेले दिसून आले. मग शेवटी तहसील कार्यालया वरती हा मोर्चा जाऊन त्या मोर्चातील लोकांकडून विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना सादर करण्यात आले. या निवेदनात महसूल विभागातील कथित गैरप्रकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

समितीचे तालुकाध्यक्ष अमर संजय व्यंजने यांनी दिलेल्या निवेदनात शिरूर अनंतपाळ येथील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांकडून फेरफार प्रकरणात गैरप्रकार झाल्याची तक्रार करण्यात आली असून त्याची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच महसूल विभागातील चुकीच्या निर्णयांमुळे शेतकऱ्यांना अनेक वर्षे न्यायासाठी हेलपाटे मारावे लागत असल्याचा आरोप करत जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी, फेरफार नोंदीसाठी कथितपणे ५ हजार ते १० हजारांची मागणी होत असल्यास ती तत्काळ थांबवावी, तहसील कार्यालयातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांचे कामकाज सीसीटीव्हीच्या देखरेखीखाली ठेवावे, तसेच भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाच वर्षांसाठी पदभारापासून दूर ठेवण्याचा नियम लागू करावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, निवेदनासोबत उपविभागीय अधिकारी, निलंगा यांनी २५ जून २०२६ रोजी काढलेल्या आदेशाची प्रतही जोडण्यात आली आहे. या आदेशानुसार शिरूर अनंतपाळ सज्जातील प्रशासकीय कामकाज सुरळीत राहण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी श्री. कुकर मारोती तुकाराम यांच्याकडे अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन महसूल विभागातील कामकाज अधिक पारदर्शक व भ्रष्टाचारमुक्त करावे, अशी अपेक्षा आंदोलकांनी व्यक्त केली.

या मोर्चासाठी मुख्य मार्गदर्शक म्हणून रयत क्रांती संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष शिवाजी समर्थ पेठे यांच्याकडून काम पाहण्यात आले. यामुळे या मोर्चाला या जन आक्रोशाला कुठलेही विकृत रूप न येता हा मोर्चा अतिशय शांततेत पार पाडण्यात आला.

## वलांडी येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याची मागणी

### जि.प. अध्यक्ष सौ. उषाताई पाटील यांना जि.प. सदस्य रामलिंग शेरे यांचे निवेदन

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. ४ ऑगस्ट : देवणी तालुक्यातील वलांडी येथे ३० खाटांचे सुसज्ज ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात यावे, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य तथा शिक्षण व क्रीडा समिती व अर्थ व नियोजन समिती सदस्य रामलिंग शेषेराव शेरे यांनी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. उषाताई पाटील यांना निवेदनाद्वारे केली.




वलांडीसह परिसरातील २९ गावांतील हजारो नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, हा या मागणीमागील प्रमुख उद्देश असल्याचे जिल्हा परिषद सदस्य रामलिंग शेषेराव शेरे यांनी यावेळी सांगितले.

निवेदनात म्हटले आहे की, वलांडी हे गाव मराठवाडा-कर्नाटक सीमावर्ती भागातील प्रमुख बाजारपेठ असून सुमारे १० हजार लोकसंख्या असलेले मध्यवर्ती केंद्र आहे. वलांडीपासून अवघ्या पाच किलोमीटरच्या परिसरात २९ गावे असून या सर्व गावांतील नागरिक शिक्षण, बँकिंग, कृषी, शासकीय कामकाज तसेच आरोग्य सेवांसाठी वलांडी येथे येत असतात. त्यामुळे या परिसरात सक्षम व अद्ययावत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

वलांडी हे गाव राज्य महामार्गावर असल्याने येथे वारंवार रस्ते अपघात घडतात. मात्र, परिसरात ग्रामीण रुग्णालय नसल्यामुळे अपघातग्रस्तांना तातडीने उपचारासाठी दूरच्या रुग्णालयात हलवावे लागते. त्यामुळे उपचारास विलंब होऊन अनेकदा गंभीर परिणामांना सामोरे जावे लागते.

याशिवाय गर्भवती माता, नवजात बालके, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांना वेळेवर आरोग्य सेवा मिळण्यात मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे वलांडी येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर करून आपत्कालीन उपचार, प्रसूती सेवा, अपघात उपचार, प्रयोगशाळा, एक्स-रे आदी आधुनिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन सार्वजनिक आरोग्य विभागाकडे आवश्यक प्रस्ताव सादर करून शासन स्तरावर पाठपुरावा करावा, अशी विनंती जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. उषाताई पाटील यांच्याकडे करण्यात आली आहे.

## आहार-विहार

डॉ. सीमा पांडे/ ९९२२९१९७२०

# संपूर्ण आरोग्यासाठी 'माईंडफुलनेस'

आज सकाळी तुम्ही काय खाल्लंय? आठवतंय का? हे जर तुम्हाला आठवावं लागत असेल तर ही समस्या आहे. आपण जे अन्न खात आहोत त्याकडे आपलं लक्ष असणं आवश्यक आहे. संपूर्ण आरोग्याच्या बाबतीत माईंडफुलनेस अत्यंत महत्वाचा आहे. माध्यमांवरही माईंडफुलनेसवर आज सर्वत्र चर्चा दिसून येते. माईंडफुलनेस अंगिकारण्यासाठी किंवा तो वाढविण्यासाठी काय केले पाहिजे, याचे उपायही सांगितले जातात. आरोग्याच्या सामान्य आणि गंभीर तक्रारी कोणतेही औषध न घेता, माईंडफुलनेस चांगला ठेवून आपण कशा प्रकारे नियंत्रणात आणू शकतो, हे ही सांगितले जाते. पण काही वेळा त्यामध्ये संदिग्धता असल्याने किंवा कधी विश्वासार्हतेचा अभाव असल्याने सामान्य लोकांपर्यंत या गोष्टी पोहोचत नाहीत.

**माईंडफुलनेस म्हणजे काय**

माईंडफुलनेस म्हणजे सजगता! वर्तमानाचे भान असणे आणि आपला वर्तमान आहे तसा स्विकारणे! आपल्या आजूबाजूला काय घडतंय याकडे आपलं पूर्ण लक्ष असणे, आपण काय करत आहोत, काय बोलत आहोत, किती आणि कसे जेवत आहोत याबद्दल सजग असणे. उदा. आपण अनेक वर्ष ज्या रस्त्याने ये-जा करत आहोत तो रस्ता आपल्या इतका सवयीचा होतो की कधी असे होते की, आपल्याला एखाद्या दिवशी दुसऱ्या ठिकाणी जायचे असते पण, आपण सवयीने रोजच्या रस्त्याने आपली गाडी नेतो. थोडे अंतर गेल्याबरोबर आपल्या लक्षात येते की, आज आपल्याला दुसरीकडे जायचे होते आणि आपण सवयीने रोजच्या दिशेने निघालो आहोत. याचा अर्थच असा की, आपण विचारांच्या तंद्रीत हरवतो. म्हणजेच आपण वर्तमानात न राहता आपलं मन अचानक भूतकाळात किंवा एखाद्या गोष्टीचा ताण असेल तर काय होईल? असा विचार करून भविष्यात जातो. आपल्या बाबतील कधी असं झालंय का की, रोज आपण तीन पोळ्या खात असू पण, एखाद्या दिवशी आपल्याला तेवढी भूक नाही. तरीही आपण रोजच्या सवयीने किंवा विचारांच्या तंद्रीत अधिक खातो आणि खाल्यावर आपल्याला जाणवतं की आपल्याला हे नको होतं तरी आपण खाल्लं. माईंडफुलनेस म्हणजे आपण जे काही करत आहोत त्याबद्दल सजग राहून योग्य ती कृती करणं आणि आपल्या छोट्या गोष्टींकडेही आपलं पूर्ण लक्ष असणं.

**माईंडफुलनेस म्हणजे काय नाही?**

माईंडफुलनेस म्हणजे काय हे लक्षात घेतल्यावर तो कशाला म्हणत नाहीत, हे सुद्धा आपल्याला स्पष्ट असणे आवश्यक आहे. एक सामान्य गैरसमज असा आहे की, माइंडफुलनेस म्हणजे एखादी विशिष्ट अवस्था मिळवण्याचा प्रयत्न करणे जिथे आपण पूर्णपणे शांत असतो, आपल्या मनात कोणतेही विचार नसतात आणि जिथे आपल्याला आनंदी किंवा समाधानी वाटते. माईंडफुलनेस म्हणजे शांत होण्याचा प्रयत्न करणे नाही. माईंडफुलनेस म्हणजे काही निर्माण करणे किंवा काही दूर लोटण्याचा प्रयत्न करणे नाही. तर जे घडत आहे ते जसे आहे तसे स्वीकारणे आणि एखाद्या गोष्टीची जाणीव ठेवणे आणि ती मनापासून स्विकारणे. एक असाही गैरसमज दिसतो की, माईंडफुलनेस म्हणजे निष्क्रिय आणि भावनाशून्य होणे. पण, तसे अजिबात नाही. माईंडफुलनेस म्हणजे परिस्थितीचं भान ठेवून व्यक्त होणे. बहुतांश लोकांच्या मनात सतत भूतकाळ किंवा भविष्याबद्दलचे विचार असतात. त्यामुळे प्रत्यक्षात काय घडत आहे याची जाणीव ठेवण्याची त्यांची मानसिक तयारी नसते. ती मानसिक क्षमता आपल्याला विकसित करावी लागते. आपल्या स्वतःच्या नैसर्गिक माईंडफुलनेसशी जोडलं जाणं आपल्याला शिकावं लागतं. या पद्धतीने मेंदू काम करावा यासाठी सरावाची गरज असते. माईंडफुलनेस ही आपली जन्मजात क्षमता आहे. जरी आपल्या मनाची सवय विचारांमध्ये हरवण्याची असली तरी सजग राहण्याची नैसर्गिक क्षमता आपल्यापैकी प्रत्येकात आहे.



ती ओळखण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. माईंडफुलनेसबद्दल अनेकदा तणाव कमी करण्याच्या दृष्टीने बोलले जाते. पण, तो इतक्यावरच मर्यादित नाही. माईंडफुलनेस आपल्या जीवनाचे कल्याण कसे वाढवू शकतो, हे समजून घेणं खूप महत्त्वाचं आहे.

माईंडफुलनेस हा आपल्या नेहमीच्या मनःस्थितीपेक्षा वेगळा आहे कारण, आपण अनेकदा आपल्या विचारांमध्ये हरवलेले असतो. सतत भविष्याची चिंता किंवा भूतकाळाबद्दल पश्चात्ताप करतो. आपण आयुष्याचा मोठा भाग आपण काय अनुभवत आहोत याची जाणीव न ठेवता घालवतो आणि त्यामुळे पाहण्यासारखी दृश्ये, ऐकण्यासारखे आवाज आणि अनुभवण्यासारखा आनंद आपण गमावतो. उदा. जेवण करताना आपलं लक्ष खाण्याकडे नसून, आपण विचारांमध्ये हरवलेले असतो. जेवणाकडे लक्ष न दिल्यामुळे ताटातील अन्नपदार्थांचा आपण आस्वाद घेऊ शकत नाहीत. आपण टीव्ही पाहत किंवा इतर कामे करताना खात असाल तर अशा सवयीमुळे, किती खाल्ले जाते यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत असतानाही अपेक्षेपेक्षा जास्त कॅलरी घेतल्या जाऊ शकतात. दुपारचे जेवण किती लक्षपूर्वक घेतले जाते, याचा दिवसभरात नंतर होणाऱ्या खाण्यावर किंवा स्नॅकिंगवरही परिणाम होऊ शकतो. संशोधनांनी सिद्ध केलं आहे की, जेवणाची आठवण जितकी ठळक असते, तितका पोट भरल्याचा अनुभव अधिक काळ टिकतो. कामाच्या ठिकाणी दुपारचे जेवण करताना सोशल मीडियावर स्क्रोल करणे यासारख्या सवयींमुळे आपण नकळत काय आणि किती खातो यावर परिणाम होतो.

ताणतणावाचा आपण काय आणि किती खातो यावर परिणाम होतो. काही लोक ताणतणावात कमी तर काही लोक जास्त खातात. हे पूर्णपणे व्यक्तीवर अवलंबून असते. ताणतणावामुळे आपल्या अन्ननिवडींवरही परिणाम होऊ शकतो. जे लोक अधिक काळ ताणतणावात असतात त्यांना अधिक उर्जा देणारे, अतिशय चविष्ट अन्न खाण्याची तीव्र इच्छा निर्माण होते कारण, अशा अन्नाचा वापर स्वतःला शांत करण्यासाठी केला जातो.

सजग खाण्यामध्ये आपल्याला भूक लागली आहे याची जाणीव, पोट भरल्याची भावना तृप्ती, अन्नपदार्थांची चव लक्षात येणे, एखादा अन्नपदार्थ खाण्याची आपल्याला तीव्र इच्छा होत आहे का? हे लक्षात येणं, आपण भावनेच्या भरात अधिक किंवा कमी खात आहोत का याची जाणीव होणं, आपण जसे आहोत तसा स्वतःचा स्वीकार करणं याकडे लक्ष देण्याचा सराव केला जातो. संशोधनानुसार सजग खाण्यामुळे अंतर्गत चरबी आणि ताणतणावाशी संबंधित कॉर्टिसोल हा हार्मोन कमी होण्यास मदत होऊ शकते. यामुळे नंतर होणारे अतिखाणे किंवा वारंवार स्नॅकिंगही कमी होऊ शकते. आपण अन्न खाताना अन्नाचा पोत, सुगंध आणि चव याकडे लक्ष दिल्यास खाण्याचा वेग कमी होतो आणि खाणे अधिक सजग होऊ शकते.

**अन्नपदार्थांच्या बाबतची द्विध्रुवी विचारसरणी**

आहाराकडे फक्त चांगले किंवा वाईट अशा टोकाच्या दृष्टीने पाहणे म्हणजेच द्विध्रुवी विचारसरणी अशी मानसिकता असल्यामुळे अनेकदा आपले खाण्यावरचे नियंत्रण सुटण्यास कारणीभूत ठरते. यामध्ये व्यक्तीला असे वाटते की, तिने एखादा नियम मोडला आहे किंवा आहारातून भरकटली आहे. त्यामुळे ती व्यक्ती अधिक प्रमाणात खाणं सुरू करते. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तिने दिवसभरात एक बिस्किट खाल्लं तर त्याला असं वाटू शकतं की आता आजचा आहार बिघडला आहे. आणि, मग उरलेल्या दिवसभरात तो त्याच्या मतानुसार वाईट असलेले अन्न खात राहतो. अन्न स्वतःहून चांगले किंवा वाईट नसते. आरोग्य आणि कल्याणावर सर्वात मोठा परिणाम एकूण आहार पद्धतीचा होतो. अन्नाशी संबंधित आपण बक्षीस-प्रेरित आणि व्यसनसदृश वर्तनांकडेही लक्ष ठेवणे महत्वाचे आहे. आपल्या शरीरात एक शक्तिशाली बक्षीस प्रणाली नैसर्गिकरित्या असते. मेंदूतील वेगवेगळे भाग अन्नाची इच्छा निर्माण करतात जसे डोपामिनमुळे अन्नाची ओढ वाढते तर ओपिऑइड्स आणि कॅनॅबिनॉइड्समुळे त्या क्षणी अन्नाचा आनंद मिळतो. अन्नाशी संबंधित व्यसनसदृश वर्तन दर्शवणारी लक्षणे ओळखणंही तितकंच महत्त्वाचं आहे. यामध्ये तीव्र प्रमाणात होणारे बिंज ईटिंग (अतिखाणे) आणि विशिष्ट अन्न खाण्याची तीव्र ओढ, अतिशय चविष्ट अन्नाला जास्त प्रतिसाद देणे अशी लक्षणे दिसतात का? याबाबत सजग असावे. आपण वर्तमानात सजग असतो तेव्हा आपण दैनंदिन आयुष्यातील लहानसहान गोष्टीत दयाळूपणाने वागतो. आनंदाचे छोटे क्षण जोपासून जीवनाच्या गूढतेबद्दल आपले कुतूहल आणि आश्चर्य भावना पुन्हा जागृत करू शकतो.

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५



# गुणकारी हिवर

मानवी जीवनासाठी व त्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी, दीर्घायुष्य जगण्यासाठी अशा कितीतरी वनस्पती, फळंफुलांची, रानभाज्यांची, रानशेंगांची, कंदमुळांची या निसर्गाने पृथ्वीतलावर निर्मिती केली आहे. कोणी त्याचा उपयोग करतात तर काही जण त्यांच्याकडे ढुंकून बघतही नाहीत. जुनी माणसं अशाच वनस्पतींचा उपयोग करीत म्हणूनच ते निरोगी दीर्घायुष्य जगत. एक अतिशय बहुगुणी रानवनस्पती जिला झाडीबोलीत 'हिवरा' असं

**लहान मुलांना होणारे 'किरीम' म्हणजे जंताचा त्रास संपविण्यासाठी हिवर वापरतात. हिवरच्या कोवळ्या झाडाच्या मुळ्या, पूर्ण वाढ झालेल्या झाडापेक्षा फायदेशीर आणि जास्त लाभदायक ठरतात. हिवराच्या झाडाची मुळं खणून आणतात. त्या मुळावरची साल काढून आतला भाग वेगळा करतात. त्याला झाडीबोलीत 'वाक' म्हणतात. या वाकाला कुटून, त्याचा रस लहान चमचाने अर्धा चमचा एक किंवा दोन वेळा पाजल्यास जंताचा त्रास जातो.**

म्हणतात तर प्रमाण मराठीत 'हिवर' म्हणतात. हिच्या मुळांचा वास घरभर पसरतो. हिवर ही लहान मुलांच्या पोटाच्या विकारावर रामबाण उपाय आहे. खाण्यातून किंवा पाण्यातून झालेल्या जंतुसंसर्गामुळे होणारे त्रास नियंत्रित करते.

लहान मुलांना होणारे 'किरीम' म्हणजे जंताचा त्रास संपविण्यासाठी हिवर वापरतात. हिवरच्या कोवळ्या झाडाच्या मुळ्या, पूर्ण वाढ झालेल्या झाडापेक्षा फायदेशीर आणि जास्त लाभदायक ठरतात. हिवराच्या झाडाची मुळं खणून आणतात. त्या मुळावरची साल काढून आतला भाग वेगळा करतात. त्याला झाडीबोलीत 'वाक' म्हणतात. या वाकाला कुटून, त्याचा रस लहान चमचाने अर्धा चमचा एक किंवा दोन वेळा पाजल्यास जंताचा त्रास जातो.

मुळावरून काढलेली साल लहान मुलाच्या कंबरेला बांधतात. सोबतच वाक कुटून काढलेला रस बाळाच्या हातापायाच्या सांध्यांवर लावतात. अतिशय कडू असलेली ही वनस्पती एवढी गुणकारी आहे की तिच्या वासामुळेच पोटातील जंत संपत असावेत. हिवराचे झाड जंगलात आणि काही मोजक्याच ठिकाणी मिळते.

मात्र आजच्या पिढीला हिवरचे झाड कसे असते तेच ओळखता येत नाही. त्या झाडाची पानं आवळ्याच्या पानांसारखी बारीक असतात. निसर्गाच्या सान्निध्यात कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी न करता, खतपाण्याशिवाय वाढणाऱ्या या दुर्मिळ वनस्पतीचा आता विसर पडत आहे.

# वीरांगना ताराराणी श्रीवास्तव

शुभांगी गान/ ८६५७४२४०७१



भारत छोडो आंदोलनाने भारतात जोर पकडला आणि महात्मा गांधींच्या नेतृत्वात प्रत्येक गाव या आंदोलनात सहभागी झाले. मोर्चे, सभा, असहकार, मिरवणुकी काढून प्रत्येक प्रांत आपापल्या परिने आंदोलनाला बळ देत होता. स्वातंत्र्याचा सूर्य बघण्यासाठी सर्व आतुर होते. त्यासाठी प्रत्येक जण सिद्ध झाला होता, प्राणाची आहुती द्यायला तत्पर होता. ताराराणी ही अशी एक विरांगना की, जिने पतीला घायाळ अवस्थेत सोडून केवळ आपला तिरंगा पोलिस ठाण्यावर फडकवण्यासाठी स्वतःचे प्राणही धोक्यात टाकले. कोण होती ही वीरांगना?

इतिहासाच्या पानांवरून काही नाव पुसली गेली पण, त्यांनी त्या काळात दाखवलेलं शौर्य, धाडस असामान्यच होतं. वीरांगना ताराराणी श्रीवास्तव! बिहारच्या राजधानी पाटण्याजवळ असलेल्या सारण या गावी एका साधारण कुटुंबात तिचा जन्म झाला. लहानपणापासून स्वातंत्र्यलढ्याचे वारे तिने अनुभवले. बापूंचे भाषण, त्यांचा सत्याग्रह, दांडीयात्रा, आंदोलन या सर्वांनीच ती प्रेरित होती. आपल्यालाही या स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेता यावा यासाठी तिचं मन कासावीस झालं होतं. पण, तो काळ असा होता की स्त्रियावर अनेक बंधन होती. मात्र, ती देशासाठी प्राणही अर्पण करायला तत्पर होती. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी तिचा विवाह फुलेंदू बाबू या अग्रणी स्वातंत्र्यसैनिकाशी झाला. फूलेंदू बाबू गांधीजींच्या विचारांनी भारावलेले होते. १९४२ च्या लढ्यात अग्रणी होते आणि समाजाविरुद्ध जाऊन त्यांनी आपल्या पत्नीला मानाचं स्थान दिलं. तिला स्वतःच्या बरोबरीने स्वातंत्र्यसंग्रामात उडी घ्यायला सहमती दिली. इतके दिवस मनात असणारी तिची ही इच्छा पूर्ण झाली. तिचे उद्दिष्ट एकच होते. ते म्हणजे आसपासच्या गावात जाऊन स्त्रियांना ब्रिटिश राजवटीविरुद्ध आवाज उठवण्यासाठी प्रेरित करणे. तिच्या या प्रयत्नांना यश आलं. या विचारांनी प्रेरित होऊन, अनेक महिलांनी या आंदोलनात सहभाग घेतला आणि ती त्यांची प्रेरणास्थान बनली. सभा, मोर्चे, आंदोलनांनी प्रत्येक गाव पेटलं होतं. फुलेंदूबाबूंनी सेवना पोलीस चौकीवर तिरंगा फडकवण्यासाठी एकत्र येण्याचं आवाहन सगळ्यांना केलं. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून जवळपास ४,००० स्त्री पुरुष या मोर्चात सामील झाले होते. राष्ट्रप्रेमाने भारलेला हा मोर्चा पुढे निघाला होता. ती दोघं मोर्चाच्या समोर हातात तिरंगा घेऊन चालत होती. इंग्रजांविरुद्ध घोषणा देत होती. प्रचंड मोठा मोर्चा सेवना पोलीस स्टेशन जवळ आला. ब्रिटीशांनी मोर्चावर लाठीहल्ला केला. तरीही मोर्चा पुढे जात होता. आता त्यांनी गोळीबार सुरु केला.

या गोळीबारात फुलेंदू बाबू जखमी झाले. ती भयंकर घाबरली पण, त्या परिस्थितीतही फुलेंदू बाबूंनी तिला आपलं कर्तव्य पूर्ण करण्याचा आदेश दिला. दुःखी मनस्थितीत तिने त्यांच्या हाताला आपल्या पदराची पट्टी बांधली आणि वेगानेच ती पोलीस चौकीकडे निघाली. सर्व अडथळे पार करीत तिने सेवना पोलीस चौकीवर तिरंगा फडकवला आणि परत फिरली. तिने आपलं कर्तव्य बजावलं होतं पण अवघा दोन वर्षांचा संसार सोडून फुलेंदूबाबू शहीद झाले होते. दुःख करायलाही वेळ नव्हता. पण, फुलेंदू बाबूंचं एकच वाक्य मनात होतं,'कोणताही कठीण प्रसंग आला तरी आसवं गाळत बसायचं नाही. या जीविताची शाश्वती नाही.' ब्रिटिश तिला शोधत होते आणि ती भूमिगत होती. स्वातंत्र्य लढ्यातील अनेक आंदोलनांमध्ये तिने सहभाग घेतला.

छापरा येथे फुलेंदू बाबू यांच्या श्रद्धांजली सभेत तिने एक संकल्प केला. 'हे क्रांतिकारकाचं जीवन आहे. कोणती गोळी कधी येईल आणि मृत्यू येईल हे सांगता येत नाही. या मायभूमीसाठी मी माझ्या रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत आणि माझ्या अंतिम श्वासापर्यंत लढेन.' त्याप्रमाणे खरोखरच ती लढली आणि स्वातंत्र्याचा सुर्योदय बघून ती समाधानी झाली.

## संगीतिका

संगीता तांबोळी/ ९८२२७३९४९३

# मेरा वो सामान लौटा दो...



गाणं म्हटलं कविता म्हटली की सगळ्यात आधी आपल्या मनात येते त्याची चाल, वापरले गेलेले शब्द, यमक, ताल, त्यात वापरला गेलेला राग आणि इतर सगळी साधनं...तसं पाहिलं तर प्रत्येकच कवितेला चाल लागल्यानंतर तीचं गाणं होतं...पण, हिंदी आणि मराठी गाण्यांमध्ये काही गाणी अशी आहेत की यमक जुळणारे शब्द नसून सुद्धा किंवा मुक्तछंदात्मक रचना असून सुद्धा त्याची गाणी झाली आणि ती अतिशय लोकप्रिय झाली.

१९८७ मध्ये प्रदर्शित झालेला चित्रपट इजाजत..या दशकाचा काळ हा चित्रपटांमध्ये प्रेम कथांचा काळ म्हणून प्रसिद्ध होता. मिलन, विरह, वेदना ,काही काही अचानक घडणाऱ्या घटना. अशा भरपूर रंजकतेने हे चित्रपट लोकप्रिय होत होते. इजाजत हा चित्रपट देखील याच धाटणीतला. यातली सगळीच गाणी तशी लोकप्रिय झालेत पण गीतकार गुलजार यांचं आणि राहुल देव बर्मन यांनी संगीतबद्ध केलेलं,'मेरा वो सामान लौटा दो आशा भोसले यांच्या मखमली आवाजात असलेले हे गाणं खरंच मनाचा वेध घेतं.

**मेरा कुछ सामान ,तुम्हारे पास पडा है**
**सावन के कुछ भीगे भीगे दिन रखे है, और मेरे खत मे लिपटी रात पडी है, वो रात बुझा दो,**
**मेरा वो सामान लौटा दो...**

या गीतामधली शेवटची ओळ वारंवार प्रत्येक कडव्यानंतर येत राहते. प्रत्येक वेळा ती वेगवेगळे संदर्भ घेऊन येते. चित्रपटातील माया या पात्राला मिळालेले हे गाणं आणि भूमिका साकारली आहे अनुराधा पटेल या गुणी अभिनेत्रीने. खरं म्हणजे, नसरुद्दीन शाह आणि रेखा यांच्यासोबत अभिनयाची टक्कर देताना, तिच्यावर चित्रित झालेले हे गाणं इतकं लोकप्रिय व्हावं, हा योगायोग म्हणण्यापेक्षा या गाण्याचे केलेले चित्रीकरण आणि याला दिले गेलेले संगीत आणि त्यावरचा तिचा अभिनय हे असावं. चित्रपटातल्या माया या पात्राला तिच्या स्वभावाला, तिच्या वृत्तीला अगदी साजेसे हे गीत.

माया आणि महिंद्र यांच्या मधील एक अनाकलनीय नातं, या गाण्यातून प्रेक्षकांच्या समोर येतं. प्रेमाच्या खुणा सांगणाऱ्या काही वस्तू, काही गोष्टी जेव्हा प्रेमीकेला परत मिळतात ,तेव्हा वस्तूंच्या पलीकडे देखील, काही प्रेमाने ओथंबलेले क्षण असतात,ते कसे परतवले जातील? हा प्रश्न हे गाणे आपल्यासमोर निर्माण करतो.

**पतझड है कुछ, है ना?**
**पतझड मे कुछ पत्तो के गिरने की आहट..**
**कानो मे एक बार पहन के लौट आई थी...**
**पतझड की वो शाखा अभी तक काँप रही है...**
**वो शाख गिरादो..**
**मेरा वो सामान लौटा दो...**

या कडव्यामध्ये संतूर चा अतिशय चपखलपणे वापर केलेला जाणवतो. आणि पडद्यावर दिसत राहते झाडाची निष्पर्ण फांदी, झाडापासून पान वेगळं झाल्यावर जसं सैरभैर होतं तशी कदाचित तिच्या मनाची अवस्थ यातून जाणवत असावी. दोघांनी एकत्र घालवलेले, श्रावणातल्या बरसातले काही क्षण देखील तिच्या मनावर कोरले गेले आहेत. ते कसे ते मनातून वेगळे करू शकणार?

**'एक अकेली छत्री मे जब आधे आधे भिग रहे थे..**
**आधे सुखे, आधे गीले...**
**सुखा तो मैं ले आई थी...**
**गीला मन शायद बिस्तर के पास पडा हो...**
**वो भिजवा दो...**
**मेरा वो सामान लौटा दो...'**

कितीतरी हळुवार क्षण त्यांनी असे एकत्र घालवलेले असतील. कदाचित प्रेमाच्या व्याख्येच्या पलीकडले. कारण महेंद्र आणि माया या दोघांचाही पडद्यावरचा वावर हा प्रेक्षकांच्या मनात कितीतरी हळवे प्रश्न निर्माण करतो. दोघांपैकी कोणाचीच चूक नाही. चूक आहे ती फक्त परिस्थितीची. हे जाणे प्रेक्षकांच्या मनात घर करते..

**'एक सौ सोलह, चांद की राते...**
**एक तुम्हारे कांधे का तिल...**
**गीली मेहंदी की खुशबू..**
**झुठमुठ के शिकवे कुछ,**
**झुठ्मुठ के वादे भी,**
**सब याद करा दो...**
**सब भिजवा दो, मेरा वो सामान लौटा दो..'**

एकत्रित घालवलेले आहे या साऱ्या क्षणांची आठवण तिच्या मनाला अधिक व्याकुळ करते. खरंच, या क्षणांचा परतावा शक्य नाही, हे जाणीवदेखील दोघांच्या मनामध्ये असते. प्रेमाने आपली एक वेगळीच दुनिया निर्माण केलेली असते. शरीराच्या पलीकडे, आत्म्याशी जुळलेलं हे प्रेम प्रेक्षकांना अस्वस्थ करून सोडते.

**एक इजाजत दे दो बस..**
**जब इसी को दफनाऊंगी..**
**मै भी वही सो जाऊंगी...**
**मै भी वही सो जाऊंगी...**

आणि इथे हे गाणं संपतं. ते रसिकांच्या मनात कायम आहे.

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/८४२२०८९६६६

साधारणतः १९५०/५५ च्या आसपास, पुढे साठीपर्यंत जन्मलेल्या लोकांना 'जिंकू किंवा मरू' हे गीत चांगलं आठवत असेल. १९६२ मध्ये चीन सोबतच्या युद्धाच्या आसपास हे गीत अधिकच लोकप्रिय झालं होतं. माझा अगदी दुसरा-तिसरा वर्ग असेल, त्या काळात हे गीत वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. 'उपकार' या हिंदी चित्रपटातील 'मेरे देश की धरती' हे गाणं १९६६ च्या आसपास वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. त्यामुळे ही गाणी रोज वाचण्यात यायची आणि ती मुखपाठ झाली . मंडळी, हे मराठी गीत आपण बघू या.




नमस्कार मंडळी! या सदराच्या माध्यमातून आपण बऱ्याच काव्यप्रकारांची ओळख करून घेतली आणि मराठीच्या समृद्धीची, श्रीमंतीची पुरेपूर कल्पना येते. 'अनंत हस्ते कमलावराने देता किती घेशील दो कराने' एवढी श्रीमंती आपल्या मराठीची आहे. मराठी काव्याचा आणखी एक विशेष प्रकार म्हणजे देशभक्त गीत! हे सर्वांना ठाऊक आहेच. शिवाय, शालेय जीवनात या देशभक्ती गीतांची ओळख सर्वांनाच झाली आहे.

जरा आठवा ते दिवस ! आपण लहान असताना कितीतरी देशभक्ती गीतं म्हणत असू. आजही स्वातंत्र्य दिन आणि गणतंत्र दिनाच्या दिवशी, शिवाय इतर राष्ट्रीय सणांच्या दिवशीही गीतं मोठ्या आवाजात लावली जातात. देशभक्ती गीत म्हणजे 'देशाप्रती प्रेम, निष्ठा, अभिमान आणि समर्पण व्यक्त करणारी, नागरिकांच्या मनात राष्ट्रीय एकतेची भावना जागृत करणारी काव्यरचना होय. हे गीत मातृभूमीचा गौरव, बलिदान, इतिहास आणि संस्कृतीचे वर्णन करते, त्यामुळे लोकांमध्ये प्रेरणा आणि राष्ट्रीय अभिमानाची भावना निर्माण होते.

या देशभक्तीपर काव्याची काही वैशिष्ट्ये आहेत. प्रेरणा आणि राष्ट्र प्रेम- ही गीतं स्वातंत्र्याचा लढा, सैनिक आणि देशाच्या महानतेवर आधारित असतात. ज्यातून नागरिकांमध्ये त्याग आणि समर्पणाची भावना रुजते. एकता व संस्कृती - यात विविध धर्म, जाती, नद्या, पर्वत आणि संस्कृतींचा उल्लेख करून देशाच्या एकात्मतेचे दर्शन घडवले जाते. ऐतिहासिक संदर्भ - ऐतिहासिक वीरांच्या कथा आणि स्वातंत्र्य चळवळीतील स्मृती या काव्यातून जागवल्या जातात. हा सगळा वारसा नव्या पिढीकडे हस्तांतरीत करण्यासाठी या गीतरचना महत्त्वाच्या ठरतात. आपल्याला ठाऊक असलेली देशभक्तीपर गाणी म्हणजे बलसागर भारत होवो, हे राष्ट्र देवतांचे, जय जय महाराष्ट्र माझा, जिंकू किंवा मरू, मंगल देशा पवित्र देशा, उठा राष्ट्रवीर हो, शूर आम्ही सरदार, सागरा प्राण तळमळला, जयोस्तुते श्री महन्मंगले, अनामवीरा, झेंडा आमुचा प्रिय, वेडात मराठे वीर दौडले सात, वंद्य वंदे मातरम ही गाणी आजही आपल्या स्मृतीकोषात जपून ठेवलेली आहेत .

वीररसपूर्ण देशभक्तीपर गाण्यांमध्ये देशाबद्दलचे प्रेम आणि आदर वाढवण्याचा मूळ गुण आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा संघर्ष प्रदीर्घ आणि कठोर होता. स्वातंत्र्य मिळाल्यामुळे, आपण ज्या देशात राहतो, त्या देशाबद्दल कृतज्ञता बाळगण्यास प्रेरित करणाऱ्या देशभक्तीपर गाण्यांची यादी खूप मोठी आहे.

साधारणतः १९५०/५५ च्या आसपास, पुढे साठीपर्यंत जन्मलेल्या लोकांना 'जिंकू किंवा मरू' हे गीत चांगलं आठवत असेल. १९६२ मध्ये चीन सोबतच्या युद्धाच्या आसपास हे गीत अधिकच लोकप्रिय झालं होतं. माझा अगदी दुसरा-तिसरा वर्ग असेल, त्या काळात हे गीत वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. 'उपकार' या हिंदी चित्रपटातील 'मेरे देश की धरती' हे गाणं १९६६ च्या आसपास वह्यांच्या मागे लिहिलेलं असायचं. त्यामुळे ही गाणी रोज वाचण्यात यायची आणि ती मुखपाठ झाली . मंडळी, हे मराठी गीत आपण बघू या.

**माणुसकीच्या शत्रुसंगे युद्ध आमचे सुरू**
**जिंकू किंवा मरू...**
**लढतील सैनिक लढू नागरिक**
**लढतील महिला लढतील बालक**
**शर्थ लढ्याची करू , जिंकू किंवा मरू**
**देश आमुचा शिवरायाचा**
**झाशीवाल्या रणराणीचा**
**शिर तळहाती धरू, जिंकू किंवा मरू**
**शस्त्राघाता शस्त्रच उत्तर**
**भूई न देऊ एक तसूभर**
**मरू पुन्हा अवतरू, जिंकू किंवा मरू**
**हानी होवो किती भयंकर**
**पिढ्यापिढ्या हे चालो संगर**
**अंती विजयी ठरू, जिंकू किंवा मरू**

**अगदी हावभाव करून हे गीत राष्ट्रीय सणांसाठी गायलं जायचं, हे अनेकांना आठवत असेल. दुसरं एक गीत बघू या !**

**वेदमंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम्**
**माऊलीच्या मुक्ततेचा यज्ञ झाला भारती**
**त्यात लाखो वीर देती जीविताच्या आहुती**
**आहुतींनी सिद्ध केला मंत्र वंदे मातरम्**
**याच मंत्राने मृतांचे राष्ट्र सारे जागले**
**शस्त्रधारी निष्ठुरांशी शांतिवादी झुंजले**
**शस्त्रहिना एक लाभो मंत्रवंदे मातरम्**
**निर्मिला हा मंत्र ज्यांनी आचरीला झुंजुनी**
**ते हुतात्मे देव झाले स्वर्गलोकी जाऊनी**
**गा तयांच्या आरतीचे गीत वंदे मातरम्**

वंदे मातरम् या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या निमित्ताने या **गीताची आठवण न झाली तरच नवल!**

**उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढाऊ**
**अभिमान धरू बलिदान करू ध्वज उंच उंच चढवू**
**परक्यांचा येता हल्ला प्रत्येक घर बने किल्ला**
**हे कोटी कोटी होती भुजदंड**
**होतील इथे ध्वजदंड**
**छातीची करूनी ढाल, लाल त्या संगिनीस भिडवू**

किंवा

**झंडा आमुचा प्रिय देशाचा फडकत वरी महान**
**करितो आम्ही प्रणाम याला करितो आम्ही प्रणाम**

जितकी गाणी/कविता आपण आठवू तेवढं कमीच आहे. आनंदाची बाब म्हणजे 'महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाव्दारे' दरवर्षी या समरगीत/देशभक्तीपर गाण्यांच्या स्पर्धा होतात. २००६ मध्ये गीत लेखनाचीही स्पर्धा झाली होती. त्यात,

**सह्याद्रीचे गडे गर्जले हाक हिमालय घाली**
**चला उठा रणशिंग वाजले एक गर्जना झाली**

या काव्यलेखनासाठी मला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त झाला होता. जरा विषयांतर झालं. राष्ट्रीय सणांना ध्वजवंदन न करता तो दिवस सुट्टीचा मानणाऱ्या लोकांना, राष्ट्रगीत ऐकल्यावर अंगावर उठणारे रोमांच कळणारच नाहीत. शिवाय, जिथे कुठे कार्यक्रम होतात, तिथे हिंदी राष्ट्र भक्ती गीतं गायली-वाजवली जातात. हिंदीला विरोध नाही पण, किमान महाराष्ट्रात ही मराठी-हिंदी संमिश्र गाणी गायली गेली तर पुढल्या पिढीला मराठी गीतांची किमान ओळख राहील. सध्या तरी एवढेच!

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# हट्टा येथील विद्यार्थी, पालकांचे शिक्षण विभागासमोर शाळा भरो आंदोलन

## मुख्याध्यापक, विज्ञान व इंग्रजी विषयाचे शिक्षक नियुक्त करण्याची मागणी





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**

वसमत तालुक्यातील हट्टा येथील जिल्हा परिषद शाळेत राजपत्रित मुख्याध्यापक तसेच विज्ञान व इंग्रजी विषयाचे शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षण विभागाने यापूर्वी लेखी आश्वासन देऊनही सदरील नियुक्ती न केल्यामुळे मंगळवार दि ४ ऑगस्ट रोजी हट्टा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी आणि पालकांनी हिंगोली येथील जिल्हा परिषद माध्यमिक विभागासमोर शाळा भरो आंदोलन केले. यावेळी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधून लवकरच मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी विद्यार्थी व पालक चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून आले.

हट्टा येथील पी एन प्रशाला येथे राजपत्रित मुख्याध्यापक, विज्ञान व इंग्रजी विषयाचे शिक्षक तसेच सेवक यांच्या जागा रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. मागील वर्षी विज्ञान विषयाचे शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. यापूर्वी ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी या मागणीसाठी आंदोलन केले होते. त्यावेळी लवकरच मुख्याध्यापक व शिक्षकांच्या नियुक्ती करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. परंतु यावर्षी शाळा सुरू होऊन तब्बल दीड महिना उलटला तरीही आश्वासन पूर्ण न केल्यामुळे दि ४ ऑगस्ट रोजी हट्टा शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनी तसेच पालक व ग्रामस्थांनी हिंगोली माध्यमिक शिक्षण विभागासमोर शाळा भरो आंदोलन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी ठिय्या मांडून जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी विद्यार्थी चांगलेच आक्रमक झाले होते. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

या आंदोलनाची दखल घेत अधिकाऱ्यांनी विद्यार्थी व पालकांशी संवाद साधला. तसेच लवकरच मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यावेळी विद्यार्थी आणि पालकांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसत होते. यावेळी तातेराव खाडे, गंगाधर माटे, नितीन खाडे, यशवंत खाडे, रवि खाडे, रामकिशन खाडे यांच्यासह पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवी दिल्ली येथील शिक्षणासाठी एकात्मिक दृष्टकोन पाठ्यक्रमात हिंगोली येथील शिक्षकांचा सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**

सांस्कृतिक स्रोत एवं प्रशिक्षण केंद्र, नवी दिल्ली यांच्या मुख्यालयात दि. २७ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत शिक्षणासाठी एकात्मिक दृष्टिकोन या विषयावर पाच दिवसीय पुनर्श्चर्या (रिफ्रेशर) पाठ्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षणात हिगोली येथील शिक्षकांनी उत्तम कामगिरी करीत ठसा उमटविला आहे.

या प्रशिक्षणामध्ये शिक्षण, साहित्य, संस्कृती, वास्तू व स्थापत्यकला, काव्य, नाट्य, कठपुतळी कला, मूर्तीकला, अभिनय, आरोग्य, योग तसेच आर्ट अँड क्राफ्ट यांसारख्या विविध विषयांवर नामवंत विषयतज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. विविध कलामाध्यमांचा शिक्षण प्रक्रियेत प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसित करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणार्थींना उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले.

या यशस्वी आयोजनामध्ये सीसीआरटीचे अध्यक्ष डॉ. विनोद नारायण इंदुरकर, संचालक पंकज कुमार, उपसंचालक डॉ. राहुल कुमार, राम शरण, क्षेत्रीय अधिकारी मिथुन दत्ता, वरिष्ठ लिपिक हरी सिंह तसेच श्रीमती हिमांशु, पूनम आणि कृष्णा यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रशिक्षणादरम्यान प्रा. भरत गुप्त, सीमा वाही मुखर्जी, डॉ. मालविका जोशी, डॉ. चारुस्मिता गुप्ता, डॉ. पुलकित जावा आणि डॉ. संजीव पाठक यांनी विविध विषयांवर प्रभावी मार्गदर्शन करून शिक्षकांना नवीन शैक्षणिक संकल्पना व अध्यापन पद्धतींची ओळख करून दिली.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या निर्देशानुसार हिंगोली जिल्ह्यातील गजानन गंगाराम गिते, रवींद्र भागवत गुट्टे, पंडित गणेशराव टार्फे आणि उमेश गुंडप्पा ममाले यांनी या राष्ट्रीय प्रशिक्षणात सहभाग घेत हिंगोली जिल्ह्याचे व महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले.

या प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान व अनुभव विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी निश्चितच उपयुक्त ठरणार असून, सहभागी शिक्षकांनी संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव वाढवल्याबद्दल शिक्षण क्षेत्रातून तसेच केंद्रप्रमुख गजानन बोरकर यांच्याकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# राष्ट्र आणि समाजाप्रती समर्पण हीच खरी सेवा- विशाल मुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**

राष्ट्र आणि समाजाप्रती समर्पित निस्वार्थ सेवा हेच राष्ट्रीय स्वंयसेवक संघाची शिकवण असून मागील १०० वर्षात भारतमातेच्या असंख्य भूमिपुत्रांनी प्रसंगी प्राण पणाला लावून भगवा ध्वज उंचावल्याने जगभरात हे सेवाकार्य पूजनीय ठरले असे उदगार विवेक विचार मंचचे हिंगोली जिल्हा संयोजक विशाल मुळे यांनी काढले. राष्ट्रीय स्वंसेवक संघ हिंगोली शहर अंतर्गत गुरु-पूजन उत्सवात ते बोलत होते.लोकसेवा मंडळाच्या रुग्ण मित्र साप्ताहिक मिलन उपक्रमाच्या सहभागाने गुरु पूजन सोहळा २ ऑगस्टला येथील बद्रीनारायण मंदिरात संपन्न झाला त्यावेळेस बौद्धिक सेवा प्रदान करताना मुळे ह्यांनी भगवा ध्वज हाच आपला गुरू असून गुरुपूजन अंतर्गत सेवा समर्पण हा मुख्य उद्देश आहे, असे म्हटले. यथाशक्ती समर्पण संपन्न करणे हे प्रत्येकाचे सामाजिक आणि राष्ट्रीय दायित्व आहे ह्यासाठी सर्व सहभागी रुग्ण मित्रांचेही त्यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण संघाचे राज्य कार्याध्यक्ष ज्येष्ट पत्रकार डॉ. विजय निलावार उपस्थित होते. ध्वजवंदन उपक्रम ईश्वर प्रजापती ह्यांनी संचलना सह संपन्न केले.रुग्ण मित्र संघटनेचे एम.एम.राऊत ह्यांनी ध्वजवंदन सुभाषित सादर केले. रुग्णमित्र एस.बी.राजुलवार ह्यांनी अमृतवचंन, तर वैयक्तिक ध्वजगीत विश्वनाथ जाधव आणि सामूहिक प्रार्थना गीत सर्वांनि म्हंटले. रुग्ण मित्र संघटनेचे प्रमुख सुरेश चिटकरे सह सर्व रुग्णमित्र यांनी समर्पित सेवा कार्य संपन्न केले.



**हिंगोली- ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप. बँकेची सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. यावेळी बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते. यावेळी बँकेचा वार्षिक लेखाजोखा मांडण्यात आला. याप्रसंगी सभासद उपस्थित होते. छाया- सुनील पाठक**

# कोनाथा येथे कायदेविषयक जनजागृती फेरी, सायबर गुन्हे, महिला व बाल सुरक्षेबाबत मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ४ ऑगस्ट**

नागरिकांची होणारी ऑनलाईन फसवणूक, महिलांवरील अत्याचार आणि बाल लैंगिक शोषण यांसारख्या गंभीर समस्यांना आळा घालण्यासाठी, तसेच विविध आपत्कालीन सेवांची माहिती सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कोनाथा येथे सोमवार, ३ ऑगस्ट रोजी भव्य कायदेविषयक जनजागृती फेरी काढण्यात आली.

जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार व हट्टा पोलीस ठाण्याच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या फेरीत शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी हातात जनजागृतीपर फलक धरून गावातील मुख्य रस्त्यांवरून फेरी काढत ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. या वेळी २०१६ पासून राज्यात प्रभावीपणे कार्यरत असलेल्या 'डायल ११२' या आपत्कालीन सेवेची सविस्तर माहिती देण्यात आली. चोरी, अपघात, महिलांवरील अत्याचार किंवा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी या सेवेचा तात्काळ वापर कसा करावा, याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन कोनाथा गावचे पोलीस पाटील राजरतन कुंटे यांनी केले होते. हट्टा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय शाखेचे अधिकारी सचीन सांगळे यांनी उपस्थितांना कायदेविषयक विविध सूचना व मार्गदर्शन केले. या प्रसंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शाहेदमिर्झा बेग, शेख रिजवाना रज्जाक,ग्रामविकास अधिकारी संजय कातोरे, अंगणवाडी सेविका सुनंदा मस्के मॅडम, आशा स्वयंसेविका मनिषा गायकवाड, रोजगार सेवक बापूराव बेंडे शाम राव पौळ यांच्यासह इतर मान्यवर, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या फेरीत गावात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, महिलांमध्ये सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण व्हावी आणि गावात बालविवाह तसेच बाल लैंगिक अत्याचार यांसारखे अनुचित प्रकार घडू नयेत, यावर विशेष भर देण्यात आला. नागरिकांना कोणतीही समस्या किंवा अडचण असल्यास हट्टा पोलीस ठाणे मदतीसाठी सदैव तत्पर असल्याचे सांगत नागरिकांनी हेल्पलाइन क्रमांकांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच तातडीच्या मदतीसाठी आवश्यक असणारे सर्व महत्त्वाचे हेल्पलाइन नंबर्स गावातील मुख्य व सार्वजनिक ठिकाणी फलकांवर लावण्यात आल्याची माहितीही पोलीस प्रशासनाच्या वतीने या वेळी देण्यात आली.

# शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणारच- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्या पात्र शेतकऱ्यांनी अद्याप ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी नोंदणी केलेली नाही, त्यांनी तातडीने नोंदणी करून घ्यावी. फार्मर आयडीशिवाय कर्जमाफीचा लाभ मिळणार नसल्याने शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या तलाठ्याशी संपर्क साधून ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

ॲग्रीस्टॅक नोंदणी करताना काही तांत्रिक अडचणी येत असल्यास शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. संबंधित अडचणींचे निराकरण करण्यात येईल. तसेच मयत खातेदारांच्या नातेवाईकांनी वारस नोंदीसाठी आवश्यक फेरफार नोंद करून सातबारा उताऱ्यावर वारसांची नोंद घेण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. यासाठी तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

कर्जमाफीचा लाभ मिळण्याची प्रक्रिया शासनस्तरावर सुरू असून शेतकऱ्यांनी कोणत्याही प्रकारचा संभ्रम बाळगण्याची गरज नाही. शेतकऱ्यांनी संबंधित बँकेत जाऊन ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करून आपल्या कर्ज खात्याशी संबंधित तपशील तपासून खात्री करावी. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असून, पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार आहे.

कर्जमाफीच्या प्रक्रियेसाठी बँकांमध्ये विनाकारण गर्दी करू नये. बँकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी शेतकऱ्यांनी सौजन्याने व सहकार्याने वागावे. बँक अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याकडून प्रतिसाद मिळत नसल्यास अथवा काही अडचण निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीबाबतची आवश्यक माहिती, प्रक्रियेचे टप्पे तसेच संबंधित बँकांचे हेल्पलाईन क्रमांक बँक शाखांमध्ये ठळकपणे प्रदर्शित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे.

कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही किंवा सीबील स्कोअरमध्ये लाभ मिळणार नाही, अशा स्वरूपाची कोणतीही माहिती शासनाकडून देण्यात आलेली नाही. शासनाच्या निर्णयानुसारच कर्जमाफीची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यामुळे कोणीही संभ्रम निर्माण करणारी माहिती देत असल्यास त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे. तसेच दि. ३० सप्टेंबर २०२१ पूर्वीची तसेच सन ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंतची कर्जमाफी संदर्भातील शासनाची भूमिका व स्पष्टीकरण स्पष्ट आहे. पात्रतेनुसार दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज शासनाकडून भरण्यात येणार असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्जाची रक्कम असल्यास शासनाच्या नियमानुसार अतिरिक्त रक्कम एकरकमी भरावी लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरून जाण्याचे किंवा अनावश्यकपणे बँकांमध्ये गर्दी करण्याचे कारण नाही. कर्जमाफीच्या प्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार, अडचण किंवा शंका असल्यास शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. संबंधित समस्यांचे योग्य प्रकारे निराकरण करण्यात येईल. पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार असून, शेतकऱ्यांनी संयम राखून शासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

# व्याख्यान आणि पोवाड्यातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची ज्योत प्रज्वलीत होते- डॉ. प्रकाश अंभोरे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**

व्याख्यान आणि पोवाड्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रप्रेम, देशभक्ती आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ होते असे प्रतिपादन मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे यांनी केले.

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय, हिंगोली येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी विविध प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर व मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या संघर्षमय जीवनाचा, स्वातंत्र्यलढ्यातील मोलाच्या योगदानाचा तसेच त्यांनी उभारलेल्या प्रतिसरकाराच्या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेतला. देशप्रेम, त्याग, शौर्य, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची मूल्ये विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकारावीत, असे आवाहन त्यांनी केले.

यानंतर शिवशाहीर बाबासाहेब देशमुख यांचा क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी पोवाडा विद्यार्थ्यांना ऐकविण्यात आला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रेरणादायी परिचय झाला. राष्ट्रभक्ती व राष्ट्रप्रेमाचे संस्कार रुजविण्याच्या विद्यालयाच्या उद्देशाला या उपक्रमातून प्रभावी बळ मिळाले.

यावेळी उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार, ज्येष्ठ अध्यापक आनंदराव गिराम, नागनाथ सोळंके, सागर डुब्बेवार, अध्यापक, अध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती. उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले. दुपार सत्रात तुकाराम खिल्लारे, संतोष बांगर, शिवशंकर वाबळे, सीताराम जोंधळे, अर्चना कापसे, रेखा पाचरणे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महसूल विभागाच्या कार्यक्षमतेमुळे प्रशासनात विश्वासआर्हता निर्माण- जिल्हाधिकारी राहुल गुप्ता




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ ऑगस्ट**

महसूल विभाग हा प्रशासनाचा महत्त्वाचा कणा असून, विविध प्रश्न व जबाबदाऱ्या प्रभावीपणे हाताळण्याची क्षमता या विभागात आहे. महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी प्रत्येक जबाबदारी निष्ठेने आणि कार्यक्षमतेने पार पाडत आहेत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत (आरटीएस) प्रकरणांचा विहित मुदतीत निपटारा करून हिंगोली जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. तसेच विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेतही जिल्ह्याने राज्यात अव्वल कामगिरी केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी महसूल विभागातील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित महसूल दिनाच्या उद्घाटन कार्यक्रमात अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ.श्रेणिक लोढा, अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मंजूषा मूथा, उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रगती चोंडेकर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) राजेश सरवदे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता म्हणाले की, लोकाभिमुख प्रशासनाच्या माध्यमातून क्षेत्रीय स्तरावरील नागरिकांचे प्रश्न तातडीने सोडविणे आवश्यक आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रत्येक कामाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहून येणाऱ्या अडचणींवर मात करावी. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कौतुक करताना त्यांनी भविष्यातही हिंगोली जिल्ह्याची कामगिरी राज्यासाठी आदर्श ठरेल, यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन केले.